RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

अमरावती
२२ रविवार फेब्रुवारी २०२६
✻ वर्ष ५ ✻ अंक २६८
✻ पृष्ठ : ६ ✻ मूल्य रु : ३


सुवर्ण संधी! सुवर्ण संधी!!
धमाका ऑफर
३ दिवस मोफत!
तुमच्या व्यवसायाला हवी आहे का मोठी प्रसिद्धी? मग 'दैनिक विदर्भ केसरी' देत आहे तुम्हाला एक जबरदस्त प्लॅटफॉर्म!
१ दिवसाच्या जाहिरातीवर ३ दिवस मोफत!
कोणासाठी: दुकानदार, शैक्षणिक संस्था, शोरूम्स आणि सर्व व्यावसायिकांसाठी.
घाई करा! ही संधी सोडू नका.
अधिक माहितीसाठी संपर्क करा:
9975532291/9096945629

## शिक्षकांनीच फोडले पेपर

### परीक्षेच्या तासाभराआधीच व्हॉट्सॲपवर केमिस्ट्रीची प्रश्नपत्रिका, खासगी शिकवणीतील शिक्षकावर संशय

**▸विदर्भ केसरी। नागपूर :**

बारावीचे फिजिक्स, केमेस्ट्री असे दोन पेपर फुटल्याप्रकरणी सदर पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सेंट उर्सुला शाळेतील एका विद्यार्थिनीच्या मोबाईलमध्ये व्हाट्सअपवर (WhatsApp) हा पेपर आला होता. वॉशरूमच्या निमित्ताने ती सतत बाहेर ये जा करीत होती. या माध्यमातून हा प्रकार उघडकीस आला आणि पेपर फुटल्याचे बिंग फुटले.



याप्रकरणी सदर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असल्याचेही राज्यमंत्री पंकज भोयर यांनी स्पष्ट केले. 15 विद्यार्थ्यांचा एक व्हाट्सअप ग्रुप तयार करण्यात आला होता. या माध्यमातून खाजगी शिकवणी वर्गाच्या एका शिक्षकाने पैसे घेऊन हे पेपर त्यांच्या व्हाट्सअप ग्रुपवर उत्तरासह शेअर केल्याचे तपासात उघडकीस आले.

यातील दोन विद्यार्थिनी या केंद्रावर होत्या आता उर्वरित तेरा विद्यार्थ्यांचा शोध घेतला जात आहे. दुसरीकडे राज्यात कॉपीमुक्त अभियान सुरू आहे. याच अभियानाचा आढावा घेण्यासाठी आज (दि.२१ फेब्रुवारी) शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी नागपुरातील संताजी महाविद्यालयात धडक दिली. विद्यार्थ्यांच्या सुविधांचीही त्यांनी यावेळी माहिती घेतली.मोबाईलमधील व्हॉट्सॲप तपासले असता, 'XII' नावाच्या ग्रुपवर परीक्षेपूर्वीच सकाळी 10 वाजून 37 मिनिटांनी केमिस्ट्रीचा पेपर अपलोड करण्यात आला होता. या विद्यार्थिनीने दिलेल्या माहितीवरून दुसऱ्या एका विद्यार्थिनीच्या बॅगेतूनही मोबाईल जप्त करण्यात आला. या दोन्ही विद्यार्थिनी एकाच ग्रुपच्या सदस्या आहेत.

### प्रशासनाची मोठी कारवाई

■ या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने कठोर पावले उचलली आहेत. सेंट उर्सुला केंद्रावरील सर्व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांची तातडीने दुसऱ्या केंद्रावर बदली करण्यात आली आहे. शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी या प्रकरणाच्या सखोल चौकशीचे आदेश दिले असून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. "संबंधित सर्व विद्यार्थ्यांची आणि संशयास्पद व्यक्तींची चौकशी सुरू आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई निश्चित केली जाईल," असे नागपूर विभागाचे अध्यक्ष डॉ. शिवलिंग पटवे यांनी स्पष्ट केले. परीक्षा सुरू होण्याच्या तब्बल एक तास आधीच (सकाळी १०:३७ वाजता) केमिस्ट्रीचा पेपर व्हॉट्सॲपवर फिरत होता. बोर्डाच्या कडक सुरक्षेचे दावे फोल ठरल्याने प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये तीव्र संतापाची लाट आहे.

■ प्राथमिक चौकशीत विद्यार्थिनींनी असा दावा केला आहे की, एका खासगी शिकवणी वर्गाच्या शिक्षकाने पैशांच्या बदल्यात हा पेपर फोडला होता. ज्या 'XII' व्हॉट्सॲप ग्रुपवर हे पेपर शेअर करण्यात आले, त्यामध्ये एकूण २१ विद्यार्थी आहेत. हे विद्यार्थी शहरातील विविध केंद्रांवर परीक्षा देत असून, आता या सर्वांची पोलिसांकडून चौकशी केली जाणार आहे. या व्यवहारात मोठी आर्थिक देवाणघेवाण झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

## ट्रम्प यांनी जागतिक टॅरिफ वाढवून 15% केले



**▸विदर्भ केसरी।**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जागतिक शुल्क (टॅरिफ) 10% वरून 15% पर्यंत वाढवण्याची घोषणा केली आहे. यापूर्वी, सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगभरातील देशांवर लावलेले शुल्क (टॅरिफ) रद्द केले होते. न्यायालयाच्या या निर्णयामुळे भारतावर लावण्यात आलेले 18% प्रतिगामी शुल्क (रेसिप्रोकल टॅरिफ) देखील आता अवैध घोषित झाले आहे.

खरं तर, ट्रम्प यांनी राष्ट्रीय सुरक्षेचा हवाला देत IEEPA कायद्याचा वापर करून एप्रिल 2025 मध्ये जगातील सुमारे 100 देशांवर शुल्क (टॅरिफ) लावण्याची घोषणा केली होती.

सर्वोच्च न्यायालयाने 6-3 च्या बहुमताने निर्णय देताना सांगितले की, ट्रम्प यांना IEEPA कायद्याचा वापर करण्याचा अधिकार नाही. हा अधिकार राष्ट्राध्यक्षांना नसून केवळ संसदेला आहे.

न्यायालयाच्या या निर्णयानंतर 3 तासांनी ट्रम्प यांनी पत्रकार परिषदेला संबोधित केले. यावेळी त्यांनी जगभरातील देशांवर नवीन कायद्याचा (कलम-122) वापर करून नवीन शुल्क (टॅरिफ) लावण्याची घोषणा केली आहे. ट्रम्प यांनी एका आदेशावर स्वाक्षरी करून जगभरातील देशांवर 15% शुल्क (टॅरिफ) लावले आहे. हे शुल्क 24 फेब्रुवारीपासून लागू होईल.

त्यांनी शुल्क (टॅरिफ) अवैध ठरवणाऱ्या न्यायाधीशांवरही टीका केली. ट्रम्प म्हणाले- मला न्यायालयातील काही न्यायाधीशांची लाज वाटते. ते देशासाठी कलंक आहेत, त्यांच्यात आपल्या देशासाठी योग्य काम करण्याची हिंमत नाही. भारतासोबतच्या व्यापार करारावर ट्रम्प म्हणाले की, या करारात कोणताही बदल होणार नाही. पंतप्रधान मोदी माझे चांगले मित्र आहेत.

## पोलिस भरतीला आलेल्या तरुणाचा धावताना मृत्यू:

**▸विदर्भ केसरी।**

छत्रपती संभाजीनगर येथे सुरू असलेल्या पोलिस भरतीत एका 23 वर्षीय तरुणाचा 1600 मीटर धावताना मृत्यू झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे. देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगून पोलिस होण्यासाठी आलेल्या या तरुणाचा मैदानावरच प्राण गेल्याने भरती प्रक्रियेला उपस्थित असलेल्या उमेदवारांवर शोककळा पसरली आहे. आज सकाळच्या सत्रात मैदानी चाचणी सुरू असताना ही घटना घडली.मृत तरुणाचे नाव संग्राम धोंडीराम शिंदे असे असून तो सांगली जिल्ह्याचा रहिवासी होता. पोलिस दलात भरती होण्याचे त्याचे स्वप्न होते आणि त्यासाठी तो गेल्या काही महिन्यांपासून कठोर सराव करत होता. पोलिस भरती प्रक्रियेसाठी तो छत्रपती संभाजीनगर येथे दाखल झाला होता. आज सकाळी सुमारे 8.15 वाजता शहरातील ग्रामीण पोलिस अधीक्षक कार्यालयाच्या मैदानावर 1600 मीटर धावण्याची चाचणी सुरू होती. त्यात सहभागी झालेल्या संग्रामने धाव सुरू केली; मात्र काही अंतर पार केल्यानंतर त्याला अचानक चक्कर आल्याचे सांगितले जाते.

## मद्यधुंद ट्रकचालकाची ट्रॅक्टरला धडक: दोन ठार

**▸विदर्भ केसरी। गडचिरोली :**

ट्रकने ट्रॅक्टरला मागून जबर धडक दिल्याने दोन जण ठार, तर तिघे जखमी झाले. यातील दोघांची प्रकृती गंभीर आहे. ही घटना आज संध्याकाळी सव्वापाच वाजताच्या सुमारास कोरचीपासून दोन किलोमीटर अंतरावरील मोहगाव फाट्याजवळ घडली. संबधित ट्रकचालक मद्यधुंद अवस्थेत होता. पोलिसांनी त्याला पाठलाग करुन पकडले सागर कल्लो (१९), रा. झेंडेपार, ता. कोरची, कैलास कोवे (३५) रा. मोहगाव,ता. कुरखेडा अशी मृतांची, तर राजेश गंगबोईर (२८ ) रा.चमरोटोला, ता. मोहल्ला (छत्तीसगड), पुरुषोत्तम मडकाम (५१) रा. चिचोली, ता.अर्जुनी मोरगाव,

## विद्यमान सरपंच हाच 'प्रशासक'

### मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीसाठी राज्य सरकारचा महत्त्वपूर्ण निर्णय

**▸विदर्भ केसरी।**

राज्य सरकारने राज्यातील मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींबाबत महत्त्वाचा निर्णय घेत प्रशासकपदाचा गुंता सोडवला आहे. 28 फेब्रुवारीपर्यंत ज्या ग्रामपंचायतींची मुदत संपत आहे, त्या ठिकाणी विद्यमान सरपंचालाच प्रशासक म्हणून नेमण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे ग्रामपातळीवरील प्रशासनात सातत्य राहणार असून अचानक बदलामुळे निर्माण होणारी प्रशासकीय पोकळी टळणार आहे.

याआधी जानेवारी महिन्यात काढलेल्या परिपत्रकानुसार 2026 मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर स्वतंत्र प्रशासक नेमण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला होता. मात्र राज्यातील ग्रामपंचायतींची मोठी संख्या आणि पंचायत समित्यांमधील विस्तार अधिकाऱ्यांची मर्यादित उपलब्धता लक्षात घेता हा निर्णय प्रत्यक्षात अंमलात आणताना अडचणी निर्माण होण्याची शक्यता होती. त्यामुळे परिस्थितीचा पुनर्विचार करून सरकारने सुधारित आदेश जारी केला आहे.




नव्या निर्णयानुसार, ग्रामपंचायतीची मुदत संपण्याच्या दिवशी जे सरपंच पदावर कार्यरत असतील, त्यांनाच प्रशासक म्हणून जबाबदारी दिली जाणार आहे. त्यांच्या मदतीसाठी विद्यमान उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांची प्रशासकीय समिती स्थापन केली जाईल. यामुळे स्थानिक पातळीवरील निर्णयप्रक्रिया सुरळीत राहण्यास मदत होईल आणि नव्या व्यक्तींना कारभार समजून घेण्यासाठी लागणारा वेळ वाचेल.

प्रशासक आणि प्रशासकीय समितीचा कार्यकाळ नेमणुकीपासून सहा महिने किंवा संबंधित ग्रामपंचायतीची निवडणूक पूर्ण होईपर्यंत, जे आधी होईल तेवढाच राहणार आहे. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होताच नियमित निवडून आलेले पदाधिकारी कारभार स्वीकारतील. हा निर्णय सध्या 28 फेब्रुवारीपर्यंत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसाठी लागू असून प्रशासक नेमण्याचे अधिकार संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे देण्यात आले आहेत. प्रशासनातील अडचणी टाळून सातत्य आणि कार्यक्षमता राखण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे.

## पोलिसांकडून आंध्रातील टोळीचा पर्दाफाश

**▸विदर्भ केसरी।**

शिर्डीच्या साईबाबा मंदिर परिसरात भाविकांच्या गर्दीचा फायदा घेऊन अत्यंत चालाकीने चोरी करणाऱ्या आंध्र प्रदेशातील एका आंतरराज्यीय टोळीला जेरबंद करण्यात शिर्डी पोलिसांना यश आले आहे. पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी ही टोळी दर अर्ध्या तासाला कपडे बदलून पुन्हा गर्दीत मिसळत असे. या कारवाईत दोन महिला, एक पुरुष आणि एका अल्पवयीन बालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. एक आरोपी फरार होण्यात यशस्वी झाला आहे.



काही दिवसांपूर्वी एका भाविकाची पर्स गर्दीत ब्लेडने कापून चोरी झाल्याची तक्रार पोलिसांत दाखल झाली होती. यानंतर पोलिसांनी मंदिर परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची कसून तपासणी केली. तपासादरम्यान काही महिला आणि पुरुष संशयास्पदरीत्या हालचाली करताना दिसले. धक्कादायक बाब म्हणजे, हे संशयित काही वेळाने कपडे बदलून पुन्हा त्याच भागात वावरत असल्याचे सीसीटीव्हीमध्ये दिसून आले.

टोळीतील महिलांनी सुरुवातीला पंजाबी ड्रेस परिधान केला होता, मात्र अवघ्या काही वेळातच त्यांनी साड्या नेसून पुन्हा गर्दीत प्रवेश केला. हे वेशांतर पोलीस आणि सुरक्षारक्षकांना चकवा देण्यासाठीच होते. पोलिसांनी या माहितीच्या आधारे सापळा रचून संशयितांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी झटापटीत एक पुरुष आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाला, तर इतर तिघांना पोलिसांनी अटक केली. झडती दरम्यान आरोपींकडून १० महागड्या कंपन्यांचे मोबाईल, रोख १ हजार १७० रुपये असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याशिवाय पर्स कापण्यासाठी वापरले जाणारे टोकदार ब्लेड्स आणि कटर पोलिसांनी हस्तगत केले

## जेवणासाठी गोंधळ घालणारे मद्यधुंद चार शिक्षक निलंबित

**▸विदर्भ केसरी। नागपूर:**


नागपूर जिल्हा परिषदेतील चार मद्यधुंद शिक्षकांवर गैरवर्तनाचा ठपका ठेवत त्यांना निलंबित करण्यात आले आहे. जि.प.च्या कर्मचारी व अधिकारी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत या शिक्षकांनी जेवणाच्या निमित्ताने गोंधळ घातला होता. अखेर, मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी हे निलंबनाचे आदेश दिले.




हिंगणा पंचायत समितीअंतर्गत सहाय्यक शिक्षक मनोज मानकर, कामठी पंचायत समितीतील गुमथी येथील साहाय्यक शिक्षक चंद्रशेखर शिंदे, एकर्डी शाळेचे साहाय्यक शिक्षक रमेश चाकुलकर व खसाळा शाळेचे साहाय्यक शिक्षक मनीष पोराटे अशी निलंबित करण्यात आलेल्या चार शिक्षकांची नावे आहेत. याखेरीज अन्य एका शिक्षकाला कारणे दाखवा नोटीस बजावल्याची माहिती आहे.

प्राप्त माहितीनुसार, जिल्हा परिषदेमध्ये ८,५०० कर्मचारी कार्यरत आहेत. जि. प. अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. यंदा १७ ते १९ फेब्रुवारीदरम्यान या विविध स्पर्धा कृषी महाविद्यालय परिसरात पार पडल्या.यादरम्यान कर्मचाऱ्यांसाठी जेवणाचीही व्यवस्था करण्यात आली होती. परंतु, मद्यप्राशन करून पाच शिक्षकांनी वाद घातला. महामुनी यांनी ही बाब गांभीर्याने घेतल्याने शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे.

## मध्यरात्री आग ;19 मजूर कुटुंबांची घरे जळून खाक



**▸विदर्भ केसरी। पुणे -**

पुण्यातील हडपसर परिसरात मध्यरात्री भीषण आग लागून 19 मजूर कुटुंबांची पत्रा-बांबूच्या शेडची घरे पूर्णपणे जळून खाक झाली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी किंवा जखमी झाल्याची घटना घडलेली नाही. अग्निशमन दलाच्या पाच गाड्या घटनास्थळी दाखल होत आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले.

या आगीत 19 कुटुंबांची घरे, संसारोपयोगी वस्तू, महत्त्वाचे कागदपत्रे आणि तीन दुचाकी जळून खाक झाल्या.येथील कुटुंबे बिगारी काम करून उदरनिर्वाह करत होती. या दुर्घटनेमुळे त्यांचा संपूर्ण संसार उद्ध्वस्त झाला आहे. स्थानिक प्रशासनाकडून नुकसानग्रस्तांना मदत देण्याची मागणी होत आहे. आग लावणाऱ्या अज्ञात मुलांचा शोध सुरू असून पोलिसांकडून तपास सुरू आहे. CCTV फुटेज तपासले जात असल्याची माहिती मिळाली आहे.

### घटना कशी घडली?

■ ही आग लोहिया गार्डन शेजारील मगरपट्टा चौकाजवळील भोरी पडळ भागात रात्री सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास लागली. स्थानिकांच्या माहितीनुसार काही अज्ञात मुलांनी मोटरसायकल पेटवली. पेटलेल्या दुचाकीचा स्फोट झाल्यानंतर शेजारील पत्र्याच्या झोपड्यांना आग लागून भीषण दुर्घटना घडली. घरातील लोकांना आग लागल्याचे लक्षात येताच त्यांनी आरडाओरडा करून सर्वांना बाहेर काढले. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली.

### अग्निशमन दलाची धावपळ

■ पुणे अग्निशमन दल तातडीने घटनास्थळी दाखल झाले.हडपसर अग्निशमन केंद्र प्रमुख प्रमोद सोनवणे व प्रभारी अधिकारी विलास धडस यांच्या मार्गदर्शनाखाली जवानांनी पाच अग्निशमन वाहनांच्या सहाय्याने आग आटोक्यात आणली.

## सेमीकंडक्टर चिप उत्पादनात आत्मनिर्भरतेचे भारताचे उद्दिष्ट

### पंतप्रधान मोदी : उत्तर प्रदेशातील एचसीएल-फॉक्सकॉन सेमीकंडक्टर युनिटचे केले भूमिपूजन

**▸विदर्भ केसरी। नवी दिल्ली :**

सेमी कंडक्टर चीप उत्पादनात आत्मनिर्भरतेचे भारताचे उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी केले. त्यांनी उत्तर प्रदेशातील एचसीएल-फॉक्सकॉन सेमीकंडक्टर युनिटचे व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे उद्घाटन केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, हे तांत्रिक स्वावलंबनाच्या दिशेने एक पाऊल आहे, यामुळे जागतिक चिप इकोसिस्टममध्ये भारताची उंची वाढवेल. भारत सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर दोन्हीमध्ये एकाच वेळी प्रगती करत आहे. भारताची आजची तांत्रिक प्रगती २१ व्या शतकात आपल्या ताकदीचा पाया रचेल, असे ते म्हणाले.

भारत देशांतर्गत एक मजबूत सेमीकंडक्टर इकोसिस्टम तयार करण्यावर लक्ष केंद्रित आहे. आज जग भारताकडे तंत्रज्ञानाच्या भविष्याचे केंद्र म्हणून पाहत असल्याचे ते म्हणाले. नवी दिल्ली येथे झालेल्या जागतिक एआय इम्पॅक्ट समिटच्या अनुषंगाने, जागतिक सेमीकंडक्टर हब बनण्याच्या भारताच्या प्रवासात हा समारंभ एक ऐतिहासिक टप्पा असल्याचे ते म्हणाले.

देश विकसित भारताच्या उद्दिष्टाकडे वेगाने काम करत आहे. त्या दृष्टीने देश काम करत असल्याचे त्यांनी सांगितले. अर्थसंकल्पाने देशाच्या प्रगतीला नवीन गती दिली आहे. एआय इम्पॅक्ट समिटमध्ये, जागतिक नेते, राष्ट्रप्रमुख आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज भारताच्या एआय क्षमता पाहण्यासाठी एकत्र आले होते, त्यांनी शेवटी देशाच्या धोरणात्मक दृष्टिकोनाची ओळख करून दिली आणि त्याचे कौतुक केले. त्यांनी नमूद केले की काल एआय शिखर परिषदेच्या समाप्तीनंतर लगेचच, भारताच्या सेमीकंडक्टर परिसंस्थेला बळकटी देण्यासाठी या मोठ्या कार्यक्रमासह देश आज पुढे जात आहे. आधुनिक जग चालवण्यासाठी आवश्यक असलेली



प्रक्रिया शक्ती प्रदान करण्यात भारत आता जगातील अव्वल राष्ट्रांसोबत उभे राहण्याचा प्रयत्न करत आहे आणि सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर पैलूंवर एकाच वेळी काम करत आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले.

चिप्सचे धोरणात्मक महत्त्व अधोरेखित करताना, पंतप्रधानांनी २१ व्या शतकातील चिप्सच्या मूल्याची तुलना २० व्या शतकातील तेलाशी केली. "कोरोना महामारीच्या काळात, जगाने चिप पुरवठा साखळीची नाजूकता पाहिली. जेव्हा पुरवठा मंदावला तेव्हा जागतिक अर्थव्यवस्था डळमळीत झाल्या", असे पंतप्रधान मोदी यांनी नमूद केले. त्यांनी अधोरेखित केले की भारताने त्या संकटातून शिकून त्याचे संधीत रूपांतर केले पाहिजे आणि चिप उत्पादनात भारताने स्वावलंबी बनले पाहिजे असा निर्णय घेतला. "आजचा कार्यक्रम या दृष्टिकोनाचे प्रतिबिंब आहे", असे ते म्हणाले.

पंतप्रधान मोदी म्हणाले की "मेड-इन-इंडिया" चिप्स विकसित भारताचा कणा आहेत, जे एआय आणि ६जी पासून संरक्षण आणि ईव्ही पर्यंतच्या महत्त्वाच्या क्षेत्रांना शक्ती देते. या दृष्टिकोनाला पाठिंबा देण्यासाठी, त्यांनी सेमीकंडक्टर मिशनच्या दुसऱ्या टप्प्यासारख्या बजेट-नेतृत्वाच्या प्रगतीसह आणि एंड-टू-एंड संशोधन आणि विकास आणि उत्पादन समर्थनासाठी रेअर अर्थ कॉरिडॉरची स्थापना यासारख्या ८५,००० तज्ञांना प्रशिक्षण देण्यासाठी सज्ज असलेल्या चिप्स टू स्टार्टअप उपक्रमावर प्रकाश टाकला.

## चिमुकलीचे अपहरण, अत्याचारानंतर पुन्हा स्थानकावर सोडले

**▸विदर्भ केसरी। पुणे :**

पुणे रेल्वे स्थानकावरून चार वर्षांच्या मुलीचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. पुणे लोहमार्ग पोलिसांनी नराधम महेश यादव (वय 25) याला अटक केली असून तो मूळचा मध्य प्रदेशचा आहे.

मध्य प्रदेशातील खंडवा जिल्ह्यात राहणारी 30 वर्षांची महिला तिचा पती, सासू आणि चार मुलांसह रोजगारासाठी महाराष्ट्रात आली होती. मनमाड–सोलापूर या भागात महिला व तिचा पती काम करत होते.16 फेब्रुवारीला रात्री महिला आणि तिचे कुटुंबीय खंडवाला जाण्यासाठी पुणे रेल्वे स्थानकावर पोहोचले. खंडवाकडे जाण्यासाठी ते प्लॅटफॉर्म क्रमांक ३ वर थांबले होते. दुसऱ्या सकाळी लवकर त्यांची ट्रेन होती. 17 फेब्रुवारी रोजी पहाटे दीड वाजता महिलेचा पती स्वच्छतागृहाकडे जात असताना त्याला चार वर्षांची मुलगी दिसली नाही. त्यांनी शोधाशोध केली असता ती सापडलीच नाही. पहाटे तीनच्या सुमारास त्यांनी रेल्वे पोलिसांत धाव घेतली. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास केला असता लाल रंगाचा टी-शर्ट व अर्धी पॅन्ट घातलेला एक तरुण मुलीचा हात धरून तिला घेऊन जाताना दिसला. नराधम तरुणासोबत जाताना मुलीने प्रतिकार केला नव्हता त्यावरुन तो पीडितेच्या ओळखीचा असावा हे स्पष्ट झाले. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज मुलीच्या पालकांना दाखवताच त्यांनी नराधमाला ओळखले. नराधम तरुण हा ट्रेन प्रवासात पीडित मुलीच्या कुटुंबियांच्या शेजारीच बसला होता, अशी माहिती समोर आली.

# अत्याधुनिक शेती:तंत्रज्ञानाची जोड

## अग्रलेख

## एआय सर्वांसाठी

सन २०२५-२६ पासून भारताने कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे एआय या क्षेत्रात आपले स्थान मजबूत केले. केंद्रीय चौकट जी २०२५ मध्येच निश्चित करण्यात आली होती. तिला आता व्यापक स्वरूप देण्यात आले. दिल्लीच्या भारत मंडपम येथे परिषद भरत आहे. एआय तंत्रज्ञानाचा उपयोग केवळ तंत्रज्ञान म्हणून न करता तिचा उपयोग लोकांच्या कल्याणासाठी आणि विकास करण्याचा उद्देश आहे. सुरुवातीला या एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी १०,३७१.९२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. या द्वारे एआय संपूर्ण भारतासाठी कसे उपयुक्त ठरेल आणि मूलभूत मॉडेल्स आणि डेटा बेसेसाठी एआय तंत्रज्ञान कसे उपयुक्त ठरेल हे या परिषदेतून सांगितले जाईल. विषय सर्वसामान्यांना थोडा कळण्यास अवघड आहे. पण यासाठीच परिषद आहे. एआयचा उपयोग करून सामान्यांचे जीवन कसे सुसह्य करता येईल. लोकसमूह, ग्रह आणि प्रगती ही ती सूत्रे आहेत. ज्यांच्या भोवती परिषदेत काम केले जाईल आणि ही सूत्रे समावेशकता, शाश्वत आणि मानवी केंद्रीत एआय या भोवती रचना तयार करण्यात आली. लोकसमूह याचा अर्थ मानव केंद्रित एआय असून मानवतावादाची सेवा मानवांचे हक्क आणि सार्वजनिक सेवांप्रती सर्व लोकांना अधिकार तसेच विश्वासाची बांधणी करून देता येतो यावर हे सूत्र आधारलेले आहे. एआय समावेशक आणि मानवी प्रतिष्ठा यांना आणि भारतातील सांस्कृतिक वैविध्याचा आदर राखून जपवणूक करेल असे दुसरे सूत्र आहे. आपला ग्रह पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत एआय पद्धतींना अनूकूल राहील असाही उद्देश आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ऊर्जा सक्षम तंत्रज्ञान आणि जबाबदारीने वापर करून हवामान कृतींना पाठिंबा देईल अशी लवचिकता प्रदान करेल असे तंत्रज्ञान उभारणे असा आहे. भारतात भरणाऱ्या परिषदेची व्याप्ती इतकी मोठी आहे, की भारत मंडपम येथे भरणाऱ्या परिषदेत २.५ लाख प्रतिनिधी उपस्थित राहणार आहे. यात परदेशातून फ्रान्सचे ईमॅन्युएल मॅक्रॉन, ब्राझिलचे लुला डासिल्व्हा, स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सँचेझ आदींसह उपस्थित रहाणार आहेत आणि परदेशातून तज्ज्ञ या परिषदेसाठी उपस्थित राहणार आहेत. त्यांच्यात सुंदर पिचाई, सेमी कंडक्टर आणि फाईव्ह जी तंत्रज्ञान राबवण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेले क्रिस्तियानो एमोन आदींचा समावेश आहे. नवी दिल्लीत सुरू होणारी परिषद ही भारतासाठी अशा प्रकारची पहिलीच परिषद आहे आणि एआय धोक्यांचे कसे व्यवस्थापन करायचे हे शिकवणारी आहे. तसेच नावीन्यपूर्ण संशोधनाला रुळावर व्यवस्थित कसे ठेवायचे याचाही विचार केला जाणार आहे. याची जी चौकट आखली आहे ती एआयचा वापर करताना पक्षपात आणि गैरवापराला आळा घालणे आणि तसे करतानाही भारताचे हेतू जबाबदार एआय व्यवस्थापन करणे यापुरते मर्यादित आहे. या परिषदेतून भारताचा हेतू हा स्पष्ट होतो, की जबाबदार एआय गव्हर्नन्सला आकार देण्याचा आहे. पण यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा आहे, की एआयच्या मार्गदर्शक तत्त्वे जी आहेत ती आरोग्य, शिक्षण, कृषी आणि वित्त यात कशी उपयोगात आणली जातील यावर विचार करण्याचा आहे. कठोर नियंत्रणाशिवाय चौकटीने सात व्यापक सूत्रे निश्चित केली आणि जी धोरणकर्ते आणि उद्योग या दोघांनाही मार्गदर्शन करतील. यामध्ये विश्वास हा पाया, पीपल फर्स्ट म्हणजे लोक सर्वोपरी, संशोधनापेक्षा संयम महत्त्वाचा आणि समानता आणि जबाबदारी यांचा समावेश आहे. या सूत्रांचा यावर भर आहे, की एआय सिस्टीमनी मानवी निर्णय प्रक्रियेला पाठिंबा दिला पाहिजे आणि तरीही ते पारदर्शक आणि कोणतेही पक्षपात टाळून साध्य करता आले पाहिजे. या परिषदेचे सर्वात प्रमुख वैशिष्ट्य हे आहे, की सध्याच्या कायद्यावरील अवलंबितता. अधिकाऱ्यांनी सांगितले आहे, की अनेक एआयशी संबंधित धोके हे सध्याच्या कायदेशीर चौकटीत समाविष्ट आहेत आणि त्यात आयटी नियमावली आणि गुन्हेगारी कायदे यांचा समावेश आहे. या मार्गदर्शक तत्वांत असे सांगितले आहे, की एआय डेव्हलपर्स आणि डिप्लॉयर्सकडून काय अपेक्षा आहे. संशोधनाला प्राधान्य देऊन सरकारने केवळ ते एआयचा प्रमुख वापर करणारे नाही तर जबाबदार आणि समावेशक कारभार जो भारताचा २०४७ साली साकार होणारा विकसित भारत दृष्टिकोन साध्य करणारा असेल असे सिद्ध करू पाहत आहे.एआयचा उपयोग विविध कारणांसाठी होतो आणि हेच या परिषदेचे सार आहे. रोजगार, भाषा, नवीन रोजगार मिळवणे, सार्वजनिक सेवा आणि सामान्य लोकांना लाभप्रद होतील अशा योजना राबवणे यासाठी एआयचा उपयोग कसा करता येईल या दृष्टीने या परिषदेत विचार केला जात आहे. ब्रिटनचे उपपंतप्रधान डेव्हीड लॅमी आणि एआय मंत्री कनिष्क नारायण हे भारतात आलेल्या शिष्ट मंडळात आहेत. त्यांनी सांगितले, की एआयचा उपयोग करून रोजच्या जीवनात कसा सामान्याना लाभ करून देता येईल आणि जगाच्या प्रत्येक कोपऱ्यात एआयचा उपयोग करून डॉक्टर त्वरीत रोगनिदान करतील, शिक्षक शिकवण्यात नवनवीन पद्धती आणतील आणि परिषदा सेवा झटपट देऊन उद्योग नवीन जनरेशनचे रोजगार तयार करतील हे पहाण्यासाठी एआयचा वापर केला जाईल. एआय हे अभूतपूर्व वचन देते की जागतिक आव्हानांना जसे की सार्वजनिक आरोग्य आणि शिक्षण आणि शेतीत उत्पादकता वाढवणे आणि त्यासोबतच मानवी हक्कांचा आदर करणे याबाबत क्रांतिकारी आहे. एआय पद्धतींचा वापर जर उपयोगकर्ते आणि विकासक यांच्यामार्फत झाला तर समाजाला त्याचा शेवटी प्रचंड लाभ होऊ शकतो. जगात सर्वात जास्त लोकसंख्या असूनही भारतात सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे आणि डिजिटल बाजारपेठांपैकी ती सर्वात वेगाने वाढणारी आहे.

## स्पेन देशातील फळांचा राजा "टँगो संत्रा

▸विदर्भ केसरी। शिरसगाव कसबा प्रतिनिधी अक्षय गुर्जर:-

**स्पेन मधील आधुनिक कृषी तंत्रज्ञान आणि सामाजिक शिस्तीचा पुष्पक खापरे यांनी मांडला आढावा**



स्पेनमधील आधुनिक टॅगो संत्रा शेती आणि तेथील शिस्तबद्ध समाजजीवनाचा आढावा घेण्यासाठी अमरावती येथील पुष्पक श्रीरामजी खापरे व अन्य सहकारी शेतकऱ्यांनी १८ फेब्रुवारी ते २४ फेब्रुवारी२०२५ ला दौरा केला होता. युरोप खंडातील वैविध्यपूर्ण स्पेन देशात शेती आणि प्रगत तंत्रज्ञानाचा अनोखा संगम पाहायला मिळत असून टेंगो संत्र्याची जगभरात मोठी निर्यात होत आहे.या दौऱ्यात स्पेनमधील जनजीवन, वाहतूक व्यवस्था आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाचे बारकावे समोर आले आहेत. स्पेनमध्ये उन्हाळ्यात जास्तीत जास्त ४४ अंश तर हिवाळ्यात ६ अंश सेल्सिअस तापमान असते. स्पेनची राजधानी माद्रिद येथील बाजारपेठ चिक्की, चॉकलेट आणि गरम उबदार कपड्यांसाठी प्रसिद्ध आहे. येथील नागरिक अतिशय शांत स्वभावाचे असून ते वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळतात. विनाकारण हॉर्न न वाजवणे हे तेथील जनतेचे वैशिष्ट्य आहे.४ वर्षांच्या बालकांपासून ८० वर्षांच्या वृद्धांपर्यंत सर्वजण जिन्स पॅन्ट, टी-शर्ट आणि गरम जर्किन अशा पोशाखात वावरतात. येथे इलेक्ट्रॉनिक आणि साध्या सायकलींचा वापर मोठ्या प्रमाणात होतो असून सायकल चालवण्यासाठी रस्त्यावर स्वतंत्र मार्ग उपलब्ध आहेत.

स्पेनमध्ये भारतीयांचा मोठा आदर सत्कार केला जातो. येथील चलनामध्ये युरोचा वापर होतो आणि हॉटेल व्यवस्था अतिशय स्वच्छ व नीटनेटकी असते. व्हॅलेन्सिया शहरात रस्त्यांच्या दुभाजकांमध्ये संत्र्याची झाडे लावलेली असून ती पर्यटकांचे स्वागत करत असल्याचे भासते. येथील आहारात बेकरी पदार्थ, सुकामेवा आणि विविध फळांचा समावेश असतो. जेवणात आणि नाश्त्यामध्ये ऑलिव्ह ऑईलचा वापर केला जातो.

स्पेनमध्ये रेड वाईकला आयुर्वेदिक अमृत मानले जाते आणि लहानांपासून थोरांपर्यंत त्याचे सेवन केले जाते. येथील लोक सोमवार ते शुक्रवार पूर्ण क्षमतेने काम करतात आणि शनिवार-रविवार सुटीचा आनंद घेतात. स्पेनमधील पोलीस दुचाकीवरून गस्त घालतात आणि त्यांची अत्याधुनिक डिजिटल उपकरणे लक्षवेधी आहेत. शहरात कुठेही कचरा किंवा उघड्या तारा दिसून येत नाहीत.मेट्रो आणि बुलेट ट्रेनमध्ये मोफत वाय-फाय सुविधा असून प्रवासी शांतपणे अभ्यास किंवा लॅपटॉपवर काम करताना दिसतात. विशेष म्हणजे मेट्रोचे सारथ्य महिला लोको पायलट करतात आणि त्या प्रवाशांचे स्मितहास्य करून स्वागत करतात. स्पेनमधील खेड्यांमध्ये शेतकरी एकत्र येऊन १००० एकरांचे गट तयार करून टेंगो संत्र्याची शेती करतात. येथील जमीन मध्यम चुनखडीयुक्त असून ठिबक सिंचन आणि मल्चिंग पेपरचा वापर करून आधुनिक पद्धतीने संत्रा लागवड केली जाते. उत्पादित मालपैकी ८० टक्के संत्रा परदेशात निर्यात केला जातो. स्पेनमध्ये संत्र्याच्या १७विविध जातींवर संशोधन करण्यात आले असून त्यात टैंगो ही जात जगप्रसिद्ध आहे. कोरडोबा येथे १९५० मध्ये फ्रुटइंटर आणि १९३४ मध्ये सेव्हील येथे सर्वांत जुने संत्रा प्रक्रिया युनिट स्थापन झाले आहे. येथील हायटेक नर्सरीमध्ये कलमे जमिनीत न बनवता प्लास्टिक कुंड्यांमध्ये कोकोपीटचा वापर करून तयार केली जातात. सरकारी नियमांनुसार प्रत्येक कलमावर बारकोड असणे अनिवार्य असून तो स्कॅन केल्यावर कलमाची संपूर्ण माहिती मिळते. खेळाच्या क्षेत्रात येथे फुटबॉलला सर्वाधिक पसंती दिली जाते.

### ऐतिहासिक प्रक्रिया प्रकल्प

- स्पेनमध्ये संत्रा प्रक्रिया उद्योगाचे जाळे अतिशय जुने आहे. सेव्हील शहरात १९३४ मध्ये सर्वात जुने संत्रा प्रक्रिया युनिट स्थापन झाले होते. त्यानंतर १९५० मध्ये कोरडोबा येथे अत्याधुनिक फुटइंटर संत्रा प्रोसेसिंग युनिटची स्थापना करण्यात आली.या प्रकल्पामुळे स्पेनच्या अर्थव्यवस्थेला मोठी भरारी मिळाली आहे

### स्पेनमधील प्रगत शेतीची वैशिष्ट्ये

- १ शेतकरी एकत्र येऊन १००० गट तयार करून नियोजनबद्ध शेती करतात.
- २ संत्रा शेतीसाठी ठिबक सिंचन आणि मल्चिंग पेपरचा वापर अनिवार्य केला आहे.
- ३ शेतातील जास्तीचे पाणी बाहेर काढण्यासाठी सिमेंट काँक्रीटच्या ड्रेनेजची सोय केली आहे.
- ४ संत्र्याच्या १७ विविध जातींवर संशोधन करून टॅगो जातीचे जागतिक उत्पादन घेतले जाते.
- ५ हायटेक नर्सरीमध्ये बारकोड प्रणालीद्वारे कलमांची संपूर्ण माहिती उपलब्ध करून दिली जाते.
- ६ उत्पादित संत्र्यापैकी ८० टक्के मालाची परदेशात यशस्वी निर्यात केली जाते.
- पुष्पक श्रीरामजी खापरे
  सदस्य, जिल्हास्तरीय फळपिक विमा समिती(मो.९८८१५२८४३३)

## पिपरियाचा वीरपुत्र अमर.

▸विदर्भ केसरी। गोंदिया,



सालेकसा तालुक्यातील पिपरिया (सुखाटोला) या छोट्याशा गावाने आज आपल्या शूर वीरपुत्राला अश्रुपूर्ण निरोप दिला. भारतीय सैन्य दलातील सुभेदार नेतराम हेमराज कटरे यांनी हिमाचल प्रदेशात कर्तव्य बजावत असताना १९ फेब्रुवारी रोजी वीरमरण पत्करले.

शनिवार २१ रोजी त्यांचे पार्थिव स्वगावी पोहोचताच संपूर्ण परिसर 'नेतराम कटरे अमर रहे'च्या घोषणांनी दुमदुमून गेला.शासकीय इतमामात व २१ तोफांच्या सलामीसह त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मातृभूमीसाठी प्राणार्पण करणाऱ्या या वीर जवानाला अखेरचा निरोप देताना गावकऱ्यांचे डोळे पाणावले होते. प्रत्येकाच्या ओठांवर अभिमान आणि हृदयात वेदना दाटून आली होती.सुभेदार कटरे हे २००१ मध्ये भारतीय सैन्यात भरती झाले होते. कर्तव्यनिष्ठा, शिस्त आणि धैर्य यांच्या बळावर त्यांनी सैन्यात मानाचे स्थान मिळवले. सध्या ते सुभेदार पदावर कार्यरत होते. हिमाचल प्रदेशातील शिमला शहरापासून सुमारे २०० किलोमीटर अंतरावर ते सेवेत असताना १९ फेब्रुवारी रोजी सडक मार्गाने प्रवास करत असताना त्यांच्या वाहनावर डोंगरावरील दरड कोसळली. या दुर्दैवी अपघातात ते हुतात्मा झाले आणि देशाने एक कर्तव्यदक्ष सैनिक गमावला. त्यांच्या पार्थिवाचे गोंदिया, आमगाव आणि सालेकसा येथे अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात आले होते. हजारो नागरिकांनी उपस्थित राहून श्रद्धांजली अर्पण केली. वातावरणात हळहळ आणि अभिमान यांचे मिश्र भाव दाटून आले होते.पिपरिया येथे झालेल्या अंत्यसंस्कारावेळी आमदार संजय पुराम, माजी आमदार सहसराम कोरोटे, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद मडामे, उपविभागीय अधिकारी कविता गायकवाड, तहसीलदार नरसय्या कोंडागुर्ले, पोलिस निरीक्षक भूषण बुराडे, पंस उपसभापती जितेंद्र बल्हारे, सरपंच अनिल सोयाम, ग्रामपंचायत अधिकारी वैष्णव यांच्यासह सैन्य दलातील अधिकारी व जवान उपस्थित होते. सर्वांनी पुष्पचक्र अर्पण करून या वीर जवानास भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.पिपरिया गावासाठी हा क्षण दु:खाचा असला, तरी आपल्या मातीतून असा शूर पुत्र जन्माला आला याचा अभिमानही तितकाच मोठा आहे. सुभेदार नेतराम कटरे यांचे बलिदान सदैव स्मरणात राहील.

## कारंजा मंडलाचे सकल हिंदू संमेलन

▸विदर्भ केसरी। कारंजा (घा.),

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त विशाल हिंदू संमेलन व संत दर्शन सोहळा सकल हिंदू समाजाच्या वतीने गुरुकुल पब्लिक स्कूलसमोरील मैदानावर रविवार २२ रोजी आयोजित करण्यात आला आहे.

हिंदू संमेलनांची योजना राबविण्यात येत असून, त्याच उपक्रमाचा एक भाग म्हणून कारंजा मंडळातील ११ गावांचा हा संयुत सोहळा साजरा होत आहे. कार्यक्रमाची सुरूवात सकाळी ९ वाजता गायत्री महायज्ञाने होणार आहे. दुपारी २ वाजता कलश यात्रा, शोभायात्रा व पारंपरिक पालखी सोहळा शहरातून मार्गक्रमण करणार आहे. सायंकाळी ४ वाजता संत दर्शन सोहळा व हिंदू संमेलन होईल.यावेळी प्रमुख वते म्हणून रा. स्व. संघाचे विदर्भ प्रांत कार्यवाह अतुल मोघे उपस्थित राहणार असून श्यामनारायणदास महाराज व साध्वी रामप्रिया माई यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी संत सखु माता, संत सयाजी महाराज, भन्ते रतनज्योती महाराज, संत ज्ञानेश्वर पवार महाराज, राजयोगिनी उमादेवी व महंत माधेराज महाराज यासह अनेक संत-महात्म्यांची उपस्थिती राहणार आहे.शहर व परिसरातील माता-भगिनींनी पारंपरिक वेशभूषेत कलश यात्रा व महायज्ञात सहभागी व्हावे तसेच सर्व हिंदू बांधवांनी कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहून हिंदू एकतेचा विराट संदेश द्यावा, असे आवाहन आयोजन समितीने केले आहे.

## आर्वी नायावरील पोलिस चौकी ठरली आडोश्याची मुतारी

▸विदर्भ केसरी। वर्धा,

वर्धेतील वाहतूक व्यवस्थेच्या नावाने कायम बोंब आहे. अतिक्रमणाने रस्ते आकुंचित झालेले आहेत. चौका चौकात असलेले वाहतूक पोलिस निरीक्षक फत चालानसाठी सावज शोधूत सावधपणे उभे असतात.

आर्वी नाका पूर्णपणे अतिक्रमणाच्या विळख्यात गेला असताना कोरोना काळात या ठिकाणी लावलेल्या छोट्या पोलिस चौकीच्या आडोशाला आता दिवसा लघुशंका आणि रात्री त्याच चौकीत भाजीपाला ठेवण्यात येत असल्याचे फिरता फिरता कळले. वर्धा शहरातील आर्वी नायावर नागरिकांच्या सुरक्षेसाठी उभारण्यात आलेली पोलिस चौकी सध्या स्वतःच असुरक्षित आणि उपेक्षित अवस्थेत दिसत आहे. मध्यवस्तीत, चारही बाजूंनी सतत वाहतुकीचा राबता असलेल्या आर्वी नाका चौकात म्हाडा कॉलनीकडे जाणाऱ्या रस्त्यावर सिग्नलच्या खाली उभी असलेली ही 'स्मॉल पोलिस चौकी' गेल्या काही वर्षापासून बंद आहे. पोलिस बंदोबस्तासाठी असलेली ही जागा आता नागरिकांच्या गैरसोयीचे आणि अस्वच्छतेचे केंद्र झाली आहे. चौकीच्या आडोशाला अक्षरशः भरदिवसा लघुशंका उरकवली जात आहे. परिणामी परिसरात दुर्गंधी पसरत असून स्वच्छतेचा पूर्ण बोजवारा उडाला आहे. याच ठिकाणी बाजूलाच भाजीविक्रेते बसतात. हे किरकोळ भाजी विक्रते रात्री त्याच पोलिस चौकीत साहित्य ठेवत असल्याचे फोटोही तरुण भारतच्या हाती लागले आहेत. लघुशंका आणि भाजीचे साहित्य एकाच ठिकाणी ठेवल्या जात असल्याने आरोग्याच्या दृष्टीनेही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

## तुला शोधु कुठे ? परीक्षेत्रात वाघ दिसेना !

### पर्यटकांची तीव्र नाराजी, वनविभागावर गंभीर प्रश्नचिन्ह




▸विदर्भ केसरी। राजहंस शेंडे

गोठणगाव (ता. कुही) : गोठणगाव गेट परिसर हा वाघ दर्शनासाठी देशभरातील पर्यटकांचे प्रमुख आकर्षण मानला जातो. मात्र सध्या येथे येणाऱ्या पर्यटकांना मोठ्या अपेक्षेने जंगल सफारीला गेल्यानंतरही वाघाचे दर्शन होत नसल्याने नाराजीचा सूर अधिक तीव्र होत चालला आहे. दररोज शेकडो पर्यटक मोठा खर्च करून, वेळ काढून गोठणगाव येथे दाखल होतात. मात्र अनेक तास जंगलात भटकंती करूनही वाघाचे अस्तित्व जाणवत नाही.

परिणामी, "जंगलात आलो तरी वाघ दिसत नाही, आणि वाघ आजूबाजूच्या शेत-शिवारात फिरतो," अशी उपरोधिक व संतप्त प्रतिक्रिया पर्यटकांकडून व्यक्त होत आहे. स्थानिक पातळीवरही अशी चर्चा आहे की, वाघांचे वास्तव दर्शन जंगलाऐवजी गावालगतच्या शेत परिसरात अधिक होत आहे. यामुळे वनविभागाच्या नियोजनावर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. जंगलात वाघ दिसत नसताना तो मानवी वस्तीच्या जवळ का फिरतोय? यावर कोणती ठोस रणनीती आखली आहे का? असे प्रश्न आता सर्रास विचारले जात आहेत.

याशिवाय, पर्यटकांकडून मोठ्या प्रमाणात शुल्क आकारले जात असताना त्यांना अपेक्षित अनुभव मिळत नसल्याने "ही फक्त महसूल गोळा करण्याची मोहीम तर नाही ना?" असा संतप्त सवालही उपस्थित केला जात आहे. सफारी व्यवस्थापनात समन्वयाचा अभाव, अपुरी माहिती व नियोजनातील त्रुटी यामुळे पर्यटकांचा अनुभव दिवसेंदिवस खालावत असल्याचे दिसून येत आहे.

### .....तर होणार निराशा केंद्र

- जर अशीच परिस्थिती कायम राहिली, तर गोठणगाव गेटची ओळख 'वाघ दर्शन केंद्र' म्हणून राहणार की 'निराशा केंद्र' म्हणून, असा सवाल आता उपस्थित होत आहे. यामुळे भविष्यात पर्यटनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### ...विभागाचे कागदी नियोजन फसले

- वनविभागाने केवळ कागदी नियोजन न करता प्रत्यक्षात वाघांच्या हालचालींवर लक्ष ठेवून सफारी व्यवस्थापनात तातडीने सुधारणा करणे गरजेचे आहे. अन्यथा पर्यटकांचा विश्वास ढासळत जाईल आणि त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावरच राहील, हे निश्चित.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

▸विदर्भ केसरी। प्रतिनिधी:-विरेंद्र चव्हाण



मोहदा :-अखंड हिंदुस्थानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 396 व्या जयंतीनिमित्त रुंझा गावात शिवराजमुद्रा मंडळ रुंझा द्वारा आयोजित समूह लोकनृत्य स्पर्धा अतिशय भव्य दिव्य व उत्साहाच्या वातावरणात पार पडली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कृषी उत्पन्न बाजार समिती पांढरकवडा चे संचालक वीरेंद्र भाऊ तोडकरी त्याचबरोबर रुंझा गावाच्या सरपंच कुमारी प्रांजली विष्णू मेश्राम, रुंझा गावातील प्रतिष्ठित नागरिक भीमरावजी सलाम, सौ.आरतीताई किशोर तोडसाम,गणेश भाऊ पंधरे, विष्णू पंधरे, प्रशांत दारवणकर, इर्शाद तिघाले, श्रीकृष्ण पेंदोर, निवृत्त तलाठी माणिकरावजी येडे, एकनाथ करपते,अतुल चौधरी सर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दाभा चे मुख्याध्यापक गणेश भाऊ आडे सर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रुंझा च्या मुख्याध्यापिका नीलिमाताई राऊत, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोहदरी येथील शिक्षक कैलास मडावी सर त्याचबरोबर इतर मान्यवर उपस्थित होते.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रुंझाच्या मुख्याध्यापिका कुमारी नीलिमाताई राऊत मॅडम यांचा त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल शिवराज मुद्रा मंडळ रुंझा यांच्याकडून सन्मान करण्यात आला.त्याचबरोबर बाबासाहेब देशमुख विद्यालय रुंझा येथील शिक्षक श्री. अतुल चौधरी सर यांचा सुद्धा त्यांच्या उत्कृष्ट अध्यापन कार्याबद्दल शिवराजमुद्रा मंडळ रुंजा यांच्याकडून सत्कार व सन्मान करण्यात आला.या समूह लोक नृत्य स्पर्धेत विविध गावातील जवळपास 30 समूहान्री आपला सहभाग नोंदवला अतिशय सुंदर असे सादरीकरण या सर्व समूहांनी या ठिकाणी केले. रुंझा गावाच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच इतक्या भव्य आणि दिव्य प्रकारे असा कार्यक्रम सर्व लोकांनी अनुभवला*या स्पर्धेमधील पुरस्कार विजेत्या समूहाचे नाव* प्रथम पारितोषिक रुपये 11111/- जिल्हा परिषद प्राथमिक,शाळा धामणी (मारेगाव*), द्वितीय पारितोषिक रुपये 9999/- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारेगाव (पांढरकवडा )तृतीय पारितोषिक 7777/-रुपये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ताड उमरी चतुर्थ पारितोषिक 4444/- रुपये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळापुर (राळेगांव )पाचवे पारितोषिक 2222/-रुपये संस्कार इंग्लिश मीडियम स्कूल रुंझा प्रोत्साहन पर पारितोषिक म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दाभा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाथरी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोहदरी...यांना प्रत्येकी एक हजार रुपये आणि सन्मानचिन्ह देण्यात आले शिवराजमुद्रा मंडळ रुंझा.. च्या सर्व सदस्यांनी या कार्यक्रमासाठी अथक असे परिश्रम घेतले शिवराज मुद्रा मंडळ रुंझा च्या सर्व सदस्यांचे गावकऱ्यांनी कौतुक केले समूह नोकरी स्पर्धा ही इतक्या भव्य दिव्य स्वरूपात आयोजित करून ती यशस्वीपणे पार पाडली आणि त्यामुळे रुंझा गावाचे नाव अभिमानाने वर उंचावले गेले याबद्दल सर्व गावकऱ्यांनी शिवराजमुद्रा मंडळ रुंझा चे कौतुक केले या समूह लोकनृत्य स्पर्धेच्या आयोजनासाठी गावातील सर्व नागरिकांनी अतिशय उत्कृष्टe असा प्रतिसाद दिला आणि सहकार्य केले त्याबद्दल शिवराज मुद्रा मंडळ रुंझा च्या सर्व सदस्यांनी रुंझा ग्रामवासियांचे आभार मानले

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l,
Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू

रविवार, २२ फेब्रुवारी २०२६ | ३

GOOD MORNING
# कॉटनसिटी
!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

## किरकोळ वादातून लाकडाने मारहाण

■ पांढरकवडा: तालुक्यातील जिरा येथे कचरा काढण्याच्या कारणावरून एका व्यक्तीला मारहाण करण्यात आली. आरोपी अरविंद शेषराव राठोड याने 'झाडझूड करू नको, माझ्या घरात धूळ येत आहे' असे म्हणून फिर्यादी सकरु रामचंद्र जाधव यांच्याशी वाद घातला. रागाच्या भरात आरोपीने बैलगाडीच्या लाकडी उभारीने फिर्यादीच्या पाठीवर, पायावर आणि छातीवर मारून जखमी केले, तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. पांढरकवडा पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

महत्त्वाचे



## जि.प.उ.प्रा.शाळा सोनदाभी येथे छ. शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

**▸विदर्भ केसरी। ढाणकी प्रतिनिधी मिलिंद चिकाटे**

छ. शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात केली. शाळेतील वेगवेगळ्या वर्गातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांनी छ. शिवाजी महाराजांच्या गीतावर नृत्य सादर केले. सर्वप्रथम वर्ग 4 थी मधला विद्यार्थी मयुरेश मारोती लुटे यांनी शिव गर्जना सादर केली. तसेच वर्ग 6 वीची विद्यार्थिनी कु. प्राची गोपीचंद रबडे आणि सृष्टी बालसिंग खसावत ह्यांनी राजमाता जिजाऊंची वेशभूषा केली होती. लहान लहान विद्यार्थ्यांनी छ. शिवाजी महाराजांच्या जीवनावर प्रकाश टाकला.

यावेळी शाळेचे शिक्षक श्री कैलाश चव्हाण सर, श्री रमेश राठोड सर, श्री नवरे सर, श्री पोतरे सर, सौ. शारदा लुटे मॅडम तसेच आशा वर्कर वनिताबई वाढेकर आदी सर्व मंडळी कार्यक्रमाला उपस्थित होती.



## मांडवा येथील नवनिर्मित लोकसहभागातील वाचनालयात पुस्तकाची वाढ

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**

पुसद तालुक्यातील मांडवा येथील ग्रामपंचायत व लोकसहभागातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालयाची दि. २६ जानेवारी रोजी निर्मिती करण्यात आली. वाचनालायासाठी अनुकुल चव्हाण यांनी ७०१० रुपयाची तर ॲड. आप्पाराव मैंद यांनी २५ पुस्तके, ग्रामपंचायत अधिकारी एस.टी.तडसे यांनी १२, आर्मी पंजाब राठोड यांनी २ स्पर्धा परीक्षेचे पुस्तके भेट दिली. त्यातच नुकतीच भर म्हणून नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज कारंजा (घा.)जि. वर्धा येथील प्रा. डॉ. उल्हास राठोड यांनी ३३ पुस्तके, प्रा. डॉ. वंदना तागडे यांनी ४ पुस्तके, प्रा. डॉ.महेंद्र गावंडे यांना ७ पुस्तके, तर प्रा. डॉ. अमित याऊल यांनी २६ पुस्तके भेट दिली. स्पर्धा परीक्षेची ७० पुस्तके प्रा. डॉ. उल्हास राठोड यांनी वाचनालयास भेट देऊन तेथील सुव्यवस्था पाहून कार्यकर्त्याचे कौतुक केले. अजून पुस्तके भेट देण्याचे आश्वासन दिले. यावेळी प्रा. डॉ. उल्हास राठोड, मुख्याध्यापक कैलास भरगाडे, शिक्षक नरेश नालमवार, गजेंद्र थोरात, राखी जयस्वाल,

# यंदा, यजमान पद 'यवतमाळ'ला!

## महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत अमरावती विभागाचे राज्यस्तरावर नावलौकिक करावे-पालकमंत्री ना. संजय राठोड

**▸विदर्भ केसरी। प्रतिनिधी,**



**यवतमाळ:** यंदाच्या विभागीय महसूल महोत्सवाचे यजमानपद यवतमाळ जिल्ह्याला मिळाले असून या महोत्सवांतर्गत विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे पालकमंत्री ना. संजय राठोड यांच्या हस्ते शनिवारी थाटात उद्घाटन झाले. या स्पर्धांच्या माध्यमातून सर्वांनी नवी ऊर्जा आणि नवा संकल्प घेऊन आपल्या शासकीय कार्यात मोठे योगदान द्यावे आणि अमरावती विभागाचे राज्यस्तरावर नावलौकिक करावे, असे प्रतिपादन पालकमंत्र्यांनी यावेळी केले.

जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित या विभागीय महसूल महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमाला जिल्हाधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक कुमार चिंता, विभागीय अपर आयुक्त अजय लहाने, संजय जाधव, सुरज वाघमारे, अपर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, निवासी उपजिल्हधिकारी अनिरुद्ध बक्षी यांच्यासह स्रव उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, महसूल संघटनांचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री ना. संजय राठोड पुढे म्हणाले की, महसूल विभागावर नेहमीच कामाचा मोठा ताण असतो. तरीही त्यांना सोपवलेली कामे तत्परतेने आणि चोखपणे पार पाडतात. या दगदगीच्या दिनक्रमाला दूर सारत क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांच्या माध्यमातून महसूल परिवारातील संबंध अधिक दृढ व्हावेत आणि लोकाभिमुख प्रशासनाच्या निर्मितीसाठी नवचैतन्य मिळावे हाच या महोत्सवाचा उद्देश आहे. शासनाचा कणा असलेला महसूल विभाग या स्पर्धांमधून अधिक ऊर्जावान आणि सजग बनल्यास महोत्सवाची फलश्रुती ठरेल. हा महोत्सव महसूल प्रशासनाला अधिक सक्षम आणि लोकाभिमुख करण्याचा एक महत्त्वाचा प्रयत्न असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

जिल्हाधिकारी विकास मीना म्हणाले की, महसूल महोत्सवांतर्गत विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे चांगले नियोजन व व्यवस्था करण्यात आली आहे. ही स्पर्धा महसूल विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठीची मोठी संधी आहे. या स्पर्धांमधून महसूल यंत्रणेत आत्मविश्वास आणि समर्पण भावना जागृत होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दि. २१, २२ आणि २३ फेब्रुवारीपर्यंत सुरु राहणाऱ्या या तीन दिवसीय महोत्सवात क्रिकेट, फुटबॉल, टेनिस, खो-खो आदी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या महोत्सवाची सुरुवात ध्वजारोहणाने आणि मशाल पेटवून करण्यात आली. तसेच आदिवासी संस्कृतीचे पारंपरिक नृत्याद्वारे सादरीकरण करण्यात आले.



### पथसंचलनात यवतमाळ जिल्हा अव्वल

■ **या विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ आणि वाशिम जिल्ह्याचे महसूल विभाग सहभागी झाले असून या स्पर्धेअंतर्गत पथसंचनाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी या पथसंचलनाला पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी मानवंदना दिली. तसेच या पथसंचलन स्पर्धेत यवतमाळ जिल्हा अव्वल ठरल्याचे पालकमंत्र्यांनी यावेळी जाहीर केले.**

# विविध स्पर्धा उत्साहात संपन्न

## मावळणी येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त उपक्रम

**▸विदर्भ केसरी। कळंब तालुका प्रतिनिधी:-विरेंद्र चव्हाण**



कळंब :-मावळणी ता कळंब,जि. यवतमाळ दिनांक 19 फेब्रुवारी 2026 रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त "छत्रपती शिवाजी महाराजांचे शेतकरी व महिला सक्षमीकरणातील योगदान – प्रेरणा ते कृती" या विषयावर विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम "ग्रामीण विकासामध्ये महिलांची क्षमता आणि नेतृत्व विकसित करणे" या प्रकल्पांतर्गत भारत रूरल लिव्हलीहूंड्स फॉउंडेशन (BRLF) व ग्राम पंचायत मावळणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात प्रभात फेरीने करण्यात आली. यामध्ये सुमारे 350 महिला व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. त्यानंतर महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. रांगोळी स्पर्धेत 16 महिलांनी, चित्रकला स्पर्धेत 25 सहभागी, संगीत खुर्ची स्पर्धेत 30 महिला, निबंध स्पर्धेत 10 स्पर्धक, तर थोर क्रांतिकारकांच्या जीवनावर आधारित वेषभूषा स्पर्धेत 30 सहभागी यांनी भाग घेतला. तसेच सदर कार्यक्रमला भारत लव्हलीहुड्स फाऊंडेशन चे सतीश माकोडे, सपना बावनेर, आदिनाथ चलवाड , अक्षय धिकार, कल्पना थूल, शुभांगी दरने, प्रणिता धोटे यांनीव जीवन विकास संस्थाचे धनंजय मिठे, व स्टाफ, तसेच मावळणी ग्राम पंचायतचे सरपंच दीपाली जामुनकर, उपसरपंच मनिषा काटे, ज्योत्स्ना भोंडे यांनी अथक परिश्रम घेतले.

कार्यक्रमामध्ये शिवाजी महाराजांच्या शेतकरी कल्याण, स्वराज्य स्थापना आणि महिला सन्मान व सक्षमीकरणातील योगदानावर मार्गदर्शन करण्यात आले. महिलांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला असून कार्यक्रमातून सामाजिक जाणीव, नेतृत्वगुण आणि ऐक्यभावना वृद्धिंगत करण्याचा संदेश देण्यात आला. सदर कार्यक्रम ग्रामपंचायत मावळणी येथे उत्साहात व यशस्वीरीत्या संपन्न झाला. ग्रामस्थ, महिला बचत गट सदस्य व स्थानिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ओबीसी अधिकारी कर्मचारी संघटनेचा रेमंड कामगारांच्या उपोषणाला जाहीर पाठिंबा

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



यवतमाळ येथील रेमंड युको डेनिम कंपनीच्या कामगारांनी प्रलंबित वेतनवाढ लागू करण्याच्या मागणीसाठी मंगळवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ पासून आझाद मैदान, यवतमाळ येथे आमरण उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाला ओबीसी अधिकारी कर्मचारी संघटना, जिल्हा यवतमाळ यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी उपोषणस्थळी भेट देत उपोषणकर्त्यांना पाठिंब्याचे पत्र प्रदान केले तसेच कामगारांच्या न्याय्य मागण्यांसाठी संघटना खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभी असल्याचे स्पष्ट केले. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष शशिकांत लोळगे, कार्याध्यक्ष डॉ. दिनेश विडुळकर, सरचिटणीस पवन थोटे यांच्यासह सुरेश भावेकर, अनिल जयसिंगपूरे, प्रभाकर खोडे, संजय चूनारकर, रवी नागरिकर, आकाश गुजरकर, विलास अवघड, किरण टेहरे आदी पदाधिकारी उपस्थित होते. तसेच एकल शिक्षक मंचचे जिल्हाध्यक्ष विनोद खरुलकर, संजय चव्हाण, स्नेहल बेंद्रे व इतर शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोलिसांच्या साक्षीने 'श्रीदेवी संग मिलन'



**▸विदर्भ केसरी। वडनेर,**

सुर्यास्तापासून सूर्योदय ते मध्यरात्री पर्यंत येथे एकच ध्यास. तो म्हणजे श्रीदेवी संग मिलन, कल्याण, खजाना वगैरे. वडनेर गावात चालणाऱ्या ऑनलाइन तसेच सट्टा मटका अड्डा. पोलिसांच्या साक्षीने हा व्यवसाय अगदी एका बँकेच्या शेजारी कॉम्प्लेसमध्ये खुलेआम सुरू आहे. परिणामी, गावकऱ्यांत संतापाची लाट उसळली आहे.

सकाळी सूर्य उगवतो तेव्हा जंगलातील हरणाच्या डोयात पहिला विचार असतो की, आपल्याला आज वाघापेक्षा जास्त वेगाने धावावे लागेल. नाही तर आपली शिकार होईल. अगदी त्याच वेळेला वाघाच्या डोयातही पहिला विचार असतो. आज आपल्याला हरणापेक्षा जास्त वेगाने धावा लागेल. नाहीतर आपल्याला उपाशी राहावे लागेल. प्रश्न तेवढा वाघाचा आणि हरणाचा नाही तर सर्वसामान्यांचा आहे. पोलिस आणि अवैध व्यावसायिक या शर्यतीप्रमाणे नागरिकांच्या जीविताशी केवळ मिळणाऱ्या लाखो रुपयांसाठी खेळ करीत आहे. पोलिसांच्या साक्षीने हा एवढा भयंकर प्रकार वरिष्ठांच्या नाकावर टिचून सुरू आहे. शासन व्यवस्थेत वरिष्ठ अधिकारी हे वाघाचे रूप असून या प्रकाराकडे दुर्लक्ष का? हा सुज्ञ नागरिकांचा प्रश्न आहे.

### आशीर्वाद कुणाचा? लाखोची माया घशात

■ **खुली परवानगी मिळत असल्याने पोलिसांना मिळणाऱ्या लाखो रुपयांच्या मोबदल्यामुळे या पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अनेक गावात अनेक बळी जात आहे. कोणत्याही अवैध धंद्यांना आजपर्यंत आळा लागला नसून सर्व प्रकारचे अवैध धंदे खुलेआम सुरू आहे. वरिष्ठांनी याकडे लक्ष देऊन तातडीने कारवाई करण्याची गरज आहे.**

हिंगणघाट तालुयातील वडनेर हे सर्वात मोठे गाव आहे. गावात पोलिस ठाणे ब्रिटिशकालीन काळापासून आहे. वडनेर पोलिस ठाणे महामार्गावर असल्यामुळे येथे संबंधित अधिकाऱ्यांचे चांगलेच फावते आहे. अगदी वर्धा जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर असलेले या पोलिस ठाण्याच्या हद्दीत वरिष्ठांचा कधीही वचक असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे येथील पोलिस प्रशासनाच्या मनमानी कारभारामुळे मोठ्या प्रमाणात खुलेआम अवैध धंदे सुरू असतात.वडनेर येथे महामार्गाच्या बाजूला बायपास रोडवर एका कॉम्प्लेसमध्ये बँकेच्या शेजारी दिवसरात्र सट्टापट्टी व्यवसाय सुरू असून सटोड्यांची जणू जत्राच भरते. मात्र, याच रस्त्याने विविध कामासाठी बँक, ग्रामीण रुग्णालय, महसूल, कृषी विभाग या कार्यालयांकडे जाणाऱ्या नागरिकांचा तसेच गावातील शेतकरी, शेतमजूरांचा हा मार्ग असल्याने आवागमन करणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.ऑनलाइन सट्टा बाजार तसेच सट्टा वरली मटका हा व्यवसाय खुलेआम सुरू असून गावातील वयस्क, तरुण मंडळी या मार्गी लागून अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. उद्ध्वस्त झालेल्या अनेकांनी या धंद्यात बरबाद झालेल्या मंडळींनी आत्महत्या केल्याचे बोलल्या जात आहे.

# वृक्षारोपणातून छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना

## शिवजयंतीनिमित्त व्ही.पी. कनिष्ठ महाविद्यालय व एम.जे.के. इंग्लिश स्कूल यांच्या वतीने उपक्रम

**▸विदर्भ केसरी। विजय निखाते**



**पुसद** दि.19 फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त व्ही. पी. कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय व एम.जे.के. इंग्लिश स्कूल, बोरगडी (पुसद) यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे विशेष उल्लेखनीय ठरला.

या कार्यक्रमाला माजी नायब तहसीलदार मा. कैलास चंद्रवंशी साहेब तसेच माजी तहसीलदार मा . इसाळकर साहेब यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. रंगराव काळे साहेब (माजी शिक्षणाधिकारी) होते.

यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रांजली दीक्षित मॅडम, एम. जे. के. स्कूल चे प्राचार्य तुषार देशमुख सर, मा.गजानन चंद्रवंशी तसेच व्ही. पी. कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय आणि एम.जे.के. इंग्लिश स्कूलचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवाजी महाराजांच्या कार्यातील निसर्गप्रेमाचा विशेष उल्लेख करण्यात आला. स्वराज्य स्थापनेच्या काळात गड-किल्ल्यांच्या परिसरातील जंगलांचे संरक्षण, पाण्याच्या स्रोतांची जपणूक आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यावर महाराजांनी भर दिला होता. "निसर्ग हा राज्याचा खरा आधार आहे" या विचाराने प्रेरित होऊन त्यांनी वनसंपत्तीचे जतन करण्याचे आदेश दिले होते, असे मान्यवरांनी आपल्या भाषणात सांगितले.

यानंतर मान्यवरांच्या हस्ते शाळा व महाविद्यालय परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. विद्यार्थ्यांना वृक्षारोपणासोबतच वृक्षसंवर्धनाचे महत्त्व पटवून देण्यात आले.


■ **अध्यक्षीय भाषणात मा.रंगराव काळे यांनी शिवाजी महाराजांच्या आदर्शातून प्रेरणा घेत पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन केले. उपस्थित मान्यवरांनीही पर्यावरण संवर्धन हीच खरी शिवजयंती साजरी करण्याची योग्य पद्धत असल्याचे मत व्यक्त केले.**

■ **या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण झाली असून शिवजयंतीचा संदेश कृतीतून साकार झाल्याचे समाधान व्यक्त करण्यात आले. यावेळी संस्थेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.**

# जिल्ह्यात रेती घाटाचा ऐतिहासिक लिलाव

## ७ पटीने अधिक बोली लावून शासनाला 'चुना' लावण्याची तयारी? अल्पावधीत साठा उपसा करण्याचे मोठे आव्हान

**▸विदर्भ केसरी। कुणाल गायकवाड**




सन २०२५-२६ या वर्षासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील ३४ रेती घाटांची लिलाव प्रक्रिया १८ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडली. यामध्ये मूल उपविभागातील सात रेती घाटांच्या लिलावाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, ज्या रेती घाटाची सरकारी किंमत २ कोटी ४९ लाख ७६ हजार ८०० रुपये निश्चित करण्यात आली होती, त्याच घाटासाठी तब्बल १७ कोटी ५४ लाख ८९ हजार ६०० रुपयांची बोली लावली गेली. ७ पटीने महागड्या किमतीत हा घाट पदरात पाडून घेणारा तो 'बडा' कंत्राटदार नेमका कोण? याची चर्चा आता जिल्ह्यात रंगू लागली असून, या अवाढव्य रकमेच्या गुंतवणुकीतून 'काळा बाजार' तर होणार नाही ना, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

■ **सात घाटांचा लिलाव आणि वेळेची मर्यादा**

मूल उपविभागातील उमा नदी पात्रातील हळदी, गन्ना, भेजगाव, चेक दहेगाव, चितेगाव, मोरवाही, मरेगाव आणि बोरमाळा अशा एकूण सात रेती घाटांतून ४६ हजार २५३ ब्रास रेती साठा उपलब्ध आहे. नियमानुसार, १० जूनपर्यंत हा संपूर्ण साठा उपसा करणे बंधनकारक आहे. मात्र, फेब्रुवारी महिना संपत आला असताना, अवघ्या साडेतीन महिन्यांच्या कालावधीत १७ कोटींहून अधिक रक्कम वसूल करणे कायदेशीर मार्गाने शक्य आहे का? हा कळीचा मुद्दा ठरत आहे.

■ **प्रशासकीय पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह?**

या लिलावामध्ये ५ दिग्गज कंत्राटदारांनी सहभाग घेतला होता. मात्र, सरकारी किमतीच्या ७ पट बोली लागल्याने प्रशासकीय वर्तुळातही आश्चर्य व्यक्त होत आहे. एवढी मोठी रक्कम खर्च करून घाट घेणारा मालक १० जूनपर्यंत शासनाचे सर्व नियम पाळून रेती काढेल की, 'गुंतवलेला पैसा' वसूल करण्यासाठी अवैध मार्गाचा अवलंब करेल, अशी भीती व्यक्त होत आहे.

### * नियम धाब्यावर बसणार का?:

■ **कमी वेळात जास्त साठा काढण्यासाठी पोकलेन किंवा तत्सम यंत्रांचा अवैध वापर होण्याची दाट शक्यता आहे.**
*** प्रशासनाचे मौन: एवढी मोठी बोली लागूनही तो घाट नेमका कोणी घेतला, त्याचे नाव अद्याप गुलदस्त्यात का ठेवण्यात आले आहे? हा पारदर्शकतेचा अभाव प्रशासनावर संशय निर्माण करणारा आहे.**

■ *** महसूल बुडणार?: अवाढव्य किमतीत घाट घेतल्यावर नफा कमावण्यासाठी कंत्राटदार ओव्हरलोड वाहतूक आणि विनापरवाना उपसा करून शासनाला लाखो रुपयांचा चुना लावण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

### जिल्ह्यात चर्चेला उधाण

■ **चंद्रपूर जिल्ह्यात या लिलावामुळे खळबळ माजली आहे. "इतकी मोठी रक्कम भरून घेतलेल्या घाटातून रेती उपसा करताना सर्वसामान्य नागरिकांना स्वस्त दरात रेती मिळेल का?" असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. जर कंत्राटदाराने अवैध मार्ग पत्करला, तर जिल्हा प्रशासन आणि खनिकर्म विभाग यावर काय कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

# प्रफुल्ल भोयर यांना 'छत्रपती संभाजी राजे युवा पुरस्कार' प्रदान

## यवतमाळच्या शिरपेचात मानाचा तुरा; मान्यवरांच्या उपस्थितीत सोहळा संपन्न

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**




यवतमाळ: सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती, यवतमाळ यांच्या वतीने दिला जाणारा यंदाचा मानाचा "छत्रपती संभाजी राजे युवा पुरस्कार २०२६" तरुण समाजसेवक व लेखक प्रफुल्ल नंदा गणपतराव भोयर यांना प्रदान करण्यात आला. छत्रपती महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी अत्यंत उत्साही आणि दिमाखदार वातावरणात हा गौरव सोहळा पार पडला. प्रफुल्ल भोयर यांनी समाजसेवा, पर्यावरण संरक्षण, साहित्य निर्मिती आणि कायदा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तरुणांना दिशा देण्याचे काम त्यांनी प्रभावीपणे केले. विविध मोहिमांच्या माध्यमातून निसर्ग रक्षणाचा संदेश दिला. सामाजिक प्रश्नांवर लेखन करून जनजागृती केली. त्यांच्या या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेऊन समितीने या पुरस्कारासाठी त्यांची निवड केली.

यवतमाळ शहरासाठी हा अत्यंत अभिमानाचा क्षण ठरला आहे. शिवतीर्थ परिसरात पार पडलेल्या या सोहळ्याला राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गजांची उपस्थिती होती. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध पत्रकार व राजकीय विश्लेषक अशोक वानखडे, नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी उईके, मराठा सेवा संघाचे ज्ञानेश्वर गायकवाड (अध्यक्ष), प्रदीप वादाफळे (स्वागताध्यक्ष), आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष मनीष पाटील उपस्थित होते. याव्यतिरिक्त वसंत घुईखेडकर, वैशाली सवई, राजेंद्र गायकवाड, नितीन खर्चे, रवी ढोक, शशिकांत खडसे, कीर्ती राऊत, विद्या खडसे यांच्यासह जिल्ह्यातील बहुसंख्य नागरिक या सोहळ्याचे साक्षीदार झाले.

"प्रफुल्ल भोयर यांच्या कार्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या या यशाने यवतमाळच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे."

# विदर्भ GOOD MORNING

!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

## वाल्मीक कराडच्या मुलांकडून आमच्या जीविताला धोका

■ बीड, : परळीतील व्यापारी महादेव मुंडे यांचा दोन वर्षांपूर्वी धारदार शास्त्र शस्त्राचे वार करून खून झाला होता.त्या प्रकरणाचा अद्याप तपास सुरू असताना आता आणखी एक धक्कादायक बाब समोर आली आहे.. या तपासात वाल्मीक कराड याच्या टोळीतील काही लोकांना ताब्यात घेतले असून यामुळे वाल्मीक कराड याची मुले सुशील कराड व श्री गणेश कराड यांच्याकडून माझ्या परिवारातील सदस्यांना धोका असल्याची भिती ज्ञानेश्वरी मुंडे यांनी व्यक्त केली आहे. याबाबत त्यांनी शुक्रवारी अपर पोलिस अधिक्षक व पोलिस अधिक्षकांना अर्ज देखील दिला आहे.

महत्त्वाचे



## शिवमुद्रा सार्वजनिक शिव मंडळाच्या वतीने भव्य शिवजयंती महोत्सव साजरा

**▸विदर्भ केसरी। दर्यापूर :( तालुका प्रतिनिधी)**

दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा दर्यापूर तालुक्यातील थिलोरी येथे शिव मुद्रा सार्वजनिक शिव मंडळाच्या वतीने शिवजयंती महोत्सव अतिशय उत्साहात पार पडला. गेल्या पाच वर्षांपासून हा शिवजयंती महोत्सव सामाजिक कार्यकर्ते विकी पाटील होले यांच्या नेतृत्वात सुरू आहे .या महोत्सवात गावातील सर्व जाती धर्मातील तरुण युवकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो. यावर्षी छत्रपती शिवाजी महाराज जयंती दिनानिमित्त भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. या मिरवणुकीमध्ये विशेष आकर्षण होते म्हणजे चिमुकल्या मुलींनी लेझीम नृत्य . लेझीम नृत्य सादर करून चिमुकल्या मुलींनी गावकऱ्यांचे मन जिंकले . त्यानंतर अतिशय शांततेच्या मार्गाने संपूर्ण गावातून वाजत गाजत छत्रपती शिवाजी महाराजांची भावी मिरवणूक पार पडली . कायदा व सुव्यवस्था सुरळीत रहावा यासाठी पोलिसांचा बंदोबस्त सुद्धा तैनात करण्यात आलेला होता. मिरवणुकी दरम्यान डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर , राजमाता अहिल्यादेवी होळकर,यांच्या पुतळ्याला हार अर्पण आयोजकांच्या वतीने करण्यात आले. मिरवणुकीत गावातील ज्येष्ठ नागरिकांनी सुद्धा सहभाग लाभलेला होता



## आमदार अब्दुल सत्तार यांना सांत्वन भेट

**▸विदर्भ केसरी। संग्रामपूर -**

राज्याचे माजी कृषीमंत्री तथा शिवसेनेचे सिल्लोड-सोयगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार अब्दुल सत्तार यांच्या धर्मपत्नी व सिल्लोड शहराच्या माजी नगराध्यक्षा नफीसा बेगम अब्दुल सत्तार यांचे काही दिवसांपूर्वी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने सिल्लोड परिसरात तसेच नातेवाईकांमध्ये शोककळा पसरली आहे.

या पार्श्वभूमीवर, संग्रामपूर तालुक्यातील बावनबीर येथील काँग्रेस नेते तथा आमदार अब्दुल सत्तार यांचे नातेवाईक कमरोद्दीन मिर्झा यांनी सिल्लोड येथे आमदार अब्दुल सत्तार व कुटुंबियांची शुक्रवार, २० फेब्रुवारी रोजी सांत्वन भेट घेतली. त्यांनी दिवंगत नफीसा बेगम यांना खिराज-ए-अकिदत अर्पण करून सांत्वन व्यक्त केले. यावेळी वजीर शाह, अशफाक खान, नाजीम खान, शेख युसूफ आदी उपस्थित होते

## बालशिवाजी इंग्लिश स्कूलच्या मिर मुजाहिद अलीने जिल्हा बॉक्सिंग स्पर्धेत पटकावले रौप्यपदक

**▸विदर्भ केसरी। संग्रामपूर -**

तालुक्यातील वानखेड फाटा येथील बालशिवाजी इंग्लिश स्कूलच्या



सहावीतील विद्यार्थी मिर मुजाहिद अली मीर जावेद अली याने सरस्वती कॉलेज शेगाव येथे बुलढाणा जिल्हा बॉक्सिंग असोसिएशनतर्फे आयोजित जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत रौप्यपदक पटकावून उल्लेखनीय कामगिरी केली. १४ वर्षांखालील ३२ ते ३४ किलो वजनगटात त्याने अंतिम फेरीपर्यंत मजल मारली आणि रौप्यपदकावर नाव कोरले. या स्पर्धेत सब-ज्युनियर, ज्युनियर आणि सीनियर अशा महिला व पुरुष गटातील अनेक खेळाडूंनी सहभाग घेतला होता. विशेष म्हणजे, संग्रामपूर तालुक्याने एकूण १९ सुवर्ण आणि ५ रौप्यपदकांसह जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला. या यशाबद्दल बालशिवाजी इंग्लिश स्कूलचे सर्वेसर्वा डॉ.प्रविण पाटील आणि प्राचार्य प्रशांत गायकवाड यांनी मिर मुजाहिद अलीचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. पुढील वाटचालीसाठी त्यांनी शुभेच्छाही दिल्या. मीर मुजाहिद अलीने आपल्या यशाचे श्रेय प्राचार्य प्रशांत गायकवाड, उपप्राचार्य संदीप साळुंके, प्रशिक्षक प्रथमेश ठाकरे, भूषण वानखडे, वैभव गाडगे, तसेच बॉक्सिंग प्रशिक्षक नागसेन इंगळे आणि आई-वडिलांना देत भविष्यात अधिक मेहनत करून आणखी पदके जिंकण्याचा निर्धार व्यक्त केला.

# शेतकरी व दूध उत्पादकांना आर्थिकदृष्टीने सक्षम करणार

## आमदार हरीश पिंपळे यांची ग्वाही : जिल्हाधिकारी यांच्या दालनात दुध उत्पादक संघाची बैठक

**▸विदर्भ केसरी। मुर्तीजापुर**

**शेतकरी व दूध उत्पादकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणार व केंद्र सरकार, राज्य सरकार आणि पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध दूध उत्पादनवाढीच्या योजनांबाबत जिल्हाधिकारी यांच्या दालनात महत्त्वपूर्ण बैठक घेणार असल्याचे प्रतिपादन आमदार हरीश पिंपळे यांनी दूध उत्पादक संघाच्या बैठकीत केले आहे**



या बैठकीत शेतकऱ्यांना व दूध उत्पादकांना शासकीय योजनांचा पूर्ण व प्रभावी लाभ कसा मिळवून देता येईल, याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. संबंधित योजनांची अंमलबजावणी अधिक गतीने व पारदर्शक पद्धतीने करण्यासाठी प्रशासन स्तरावर ठोस प्रयत्न केले जातील, असे आश्वासन आमदार हरीश पिंपळे यांनी उपस्थितांना दिले. यावेळी त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, "दूध उत्पादन क्षेत्र मजबूत झाले तर ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक सक्षम होईल. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचवण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करणे गरजेचे आहे." जिल्हा दूध उत्पादक संघाचे अध्यक्ष प्रशांत हजारी यांनी बैठकीत सर्व दूध उत्पादक संस्था व शेतकऱ्यांना महत्त्वपूर्ण आवाहन केले. त्यांनी सांगितले की, जे दूध उत्पादन सुरू करण्याच्या तयारीत आहेत किंवा बंद अवस्थेत आहेत त्यांनी तातडीने उत्पादन सुरू करावे. शासनाच्या विविध अनुदान व प्रोत्साहन योजनांचा लाभ घ्यावा

संघटनात्मक पातळीवर सक्रिय सहभाग नोंदवावा यामुळे दूध उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्नही लक्षणीयरीत्या वाढू शकते, असा विश्वास शेवटी प्रशांत हजारी यांनी व्यक्त केला. आयोजित अकोला जिल्हा दूध संघाच्या मासिक बैठकीत आमदार हरीश पिंपळे अध्यक्ष प्रशांत हजारी, शिवा मोहाड उपाध्यक्ष दूध संघ अकोला, नाना भाऊ भिसे सदस्य व इतर सदस्य राहुल गांधी, साहेबराव जाधव, अन्सार खाँ,ब्रह्म पांडे अकोट, सौ नूतन ताई हरीश पिंपळे, वंदना ताई आगे, प्रभाकर नगराळे व्यवस्थापक गोविंदराव आगे, सहायक शाम पांडे, शासकीय दूध व्यवस्थापक सोळंके सर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यवस्थापक गोविंदराव आगे यांनी केले तर आभार साहेबराव जाधव (घोटा) यांनी मानले

### सकारात्मक पाऊल उचलणार

■ शेतकऱ्यांना योजनांची माहिती पोहोचवणे प्रत्यक्ष लाभ मिळण्यात येणाऱ्या अडचणी दूर करणे दूध उत्पादक संस्थांना पुन्हा सक्रिय करणे उत्पादन वाढीस चालना देणे या बैठकीमुळे जिल्ह्यातील दूध व्यवसायाला नवसंजीवनी मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, प्रशासन व लोकप्रतिनिधींच्या समन्वयातून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्याच्या दिशेने सकारात्मक पाऊल उचलले जाणार या आयोजित बैठकीचा उद्देश होता.

# नुकसानीचे शेतकऱ्यांचे शेकडो अर्ज रिजेक्ट

## शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांची शेतकऱ्यांनसह मुख्यवनसंरक्षक कार्यालयावर धडक

**▸विदर्भ केसरी। अमोल धवसे**



नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील शेतकऱ्यांचे वन्य प्राण्यांच्या हौदसामुळे झालेल्या नुकसानीचे नुकसान भरपाईचे शेकडो अर्ज किरकोळ कारणास्तव वडाळी वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी रिजेक्ट केल्याने शिवसेना ठाकरे गटाचे प्रकाश मारोटकर यांनी शेतकऱ्यांनसह मुख्य वनसंरक्षक कार्यालयावर धडक देऊन तक्रार सादर केली

नांदगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणात नीलगाय जंगली डुक्कर यासारखे वन्य प्राणी असल्यामुळे शेतकऱ्यांना शेती पिकांचे प्रचंड नुकसान केल्याने सदर नुकसानीची वनविभागा मार्फत नुकसान भरपाई मिळण्याकरिता अधिकारी कार्यालयाकडे नांदगाव मंगरूळ सावनेर जामगाव कोठेडा खंडाळा माहुली जामठी जणूना भगूरा लोणी मोरगाव इत्यादी गावातील शेतकऱ्यांनि अर्ज सादर केले सदर अर्ज किरकोळ कारणासाठी रिजेक्ट केले त्यामध्ये सामूहिक शेती असणाऱ्या शेतकऱ्यांचे स्वायमघोषणा प्रतिज्ञा पत्र नसणे एका शेतकऱ्यांन कडून एकच अर्ज स्वीकारणे अर्जदारांची स्वाक्षरी नसणे अर्जासोबत बँक खाते नंबर नसणे शेतकऱ्यांनि स्वतः कार्यालयात तक्रार दाखल न करणे तीन दिवसाचे आत पीक नुकसानीचा अर्ज सादर करणे इत्यादी किरकोळ कारणांसाठी अर्ज रिजेक्ट केले आहे

वास्तविक सदरचे अर्ज त्रुटी मध्ये ठेऊन संबंधित शेतकऱ्यांना कळविने तसा शासन निर्णय आहे परंतु नव्याने रुजू झालेले वडाळी वनपरिक्षेत्र अधिकारी सदरचे अर्ज रिजेक्ट करतात त्यामुळे शेकडो शेतकरी नुकसान भरपाई पासून वंचित आहे शेकडो शेतकऱ्यांनि शिवसेनेचे समन्वयक न प गटनेते प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वाखाली मुख्य वनसंरक्षक कार्यालयात धडक देऊन तक्रार सादर केली

यावेळी तात्काळ चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश मुख्य वनसंरक्षक बॅनर्जी यांनी जिल्हा वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना दिले यावेळी नगराध्यक्ष सौ प्राप्ती मारोटकर अतुल गावणार नितीन बुराडे राजू वावगे गणेश अलोने अशोक चरडे सुभाष गुलहाने राहुल ढगे शाहरुख पठाण इत्यादी शेतकरी उपस्थित होते

# खासदार काळे यांनी लिहिले रुग्णालयासाठी रक्ताने पत्र

**▸विदर्भ केसरी। सिंदी (रेल्वे),**

सिंदीत टाळ-मृदंगाचा गजर झाला, निवेदने दिली, आश्वासने ऐकविली पण सरकार हलले नाही. अखेर संतापलेल्या सिंदीकरांनी स्वतःच्या रताने पत्र लिहून थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाब विचारण्याचा निर्धार केला आहे.

आमच्या जिवाशी खेळ थांबवा, ग्रामीण रुग्णालय द्या, असा संदेश या रतपत्रांतून देण्यात आला आहे.

पालिकेचे शहर असूनही सिंदीत सक्षम आरोग्यसेवा नाही, ही वस्तुस्थिती संतापजनक आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र आहे; पण गंभीर रुग्णांना उपचारासाठी मैलोनमैल धाव घ्यावी लागते. अनेकवेळा उपचाराच्या विलंबामुळे रुग्णांनी प्राण गमावले, तरी शासनाच्या कानावर जणू कापूसच. आमदार, खासदार, मंत्र्यांना वारंवार निवेदने देऊनही ठोस निर्णय नाही. आश्वासनांचा पाऊस आणि प्रत्यक्षात कोरडी जमीन अशी अवस्था सिंदीकरांची झाली आहे. जागे व्हा, असा इशारा देण्यात आला. मात्र, सत्ताधाऱ्यांनी दुर्लक्षच केले. अखेर शिवजयंतीच्या पर्वाचे औचित्य साधून रतातून शब्द उमटवण्याचा निर्णय झाला. गुरुवारी ५३७ जणांनी, तर शुक्रवारी ५०८ जणांनी आणि शनिवारी ४९२ जणांनी १० मिलिलिटर रत काढून पत्र लिहिले. तीन दिवसांत तब्बल १५३७ रताने पत्र लिहून शासनाला पाठवण्यात आली. तीन दिवसीय आंदोलनाच्या स्वयंस्फूर्त सहभागाने आंदोलनस्थळी चक मतदानासारख्या रांगा लागल्या होत्या.

# शिवजयंती निमित्त शाळेत व्याख्यान तर भव्य मिरवणूकीचे आयोजन!



**▸विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर**

बाळापूर तालुक्यातील श्री बालाजी इंग्लिश स्कूल वाडेगाव येथे शिवजयंती साजरी करण्यात आली श्री बालाजी इंग्लिश स्कूल येथे शिवजयंती निमित्त गावातून भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली या मिरवणुकीमध्ये शिवाजी महाराजांच्या वेशात चेतन इंगळे तसेच स्वरा मसने हिने जिजामाते ची भूमिका सादर केली होती तुकाराम महाराजांची भूमिका श्रीनिवास मसने याने साकारली गावात अनेक ठिकाणी शिवाजी महाराजांच्या पालखीची स्वागत करण्यात आले नंतर शाळेमध्ये शिवचरित्रकार अनुप बोचरे यांचे व्याख्यान सादर झाले त्यानी विद्यार्थ्यांना शिवाजी महाराजांनी कठीण परिस्थितीमध्ये कसा विजय मिळवला जीवनामध्ये यशस्वी कसे व्हायचे हे सांगितले या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष श्री विलास वरोकार तसेच उपाध्यक्ष विलास हुसे सचिव अरुण पोटदुखे कोषाध्यक्ष बळीराम घाटोळ सहसचिव देवानंद कातखेडेतसेच शाळेचे मुख्याध्यापक दीपक मसने व वर्षा पांडे मॅडम शिक्षक व शिक्षेक्तर कर्मचारी उपस्थित होते तसेच या कार्यक्रमाला बहुसंख्य पालक उपस्थित होते कार्यक्रमाचे संचालन मानकर मॅडम व वनिता धोत्रे मॅडम यांनी केले आभार प्रदर्शन विजया चिंचोलकार मॅडम यांनी केले

# आत्मविकास आणि सामाजिक जाणीव हाच शाश्वत विकासाचा पाया : प्रा. डॉ. नरेंद्र माने

**▸विदर्भ केसरी। दर्यापूर**

### रासेयो शिबिरात युवकांना मार्गदर्शन



- आजचा युवक हा देशाचा आधारस्तंभ आहे. वायूचा वेग आणि प्रचंड नैसर्गिक ऊर्जा असलेला युवक हा समाजासाठी विधायक व शाश्वत काम करू शकतो. मात्र त्यासाठी त्याला आधी सक्षम होणे आवश्यक आहे. आत्मविकास हा शाश्वत विकासाचा पहिला आणि सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे. आत्मविकास म्हणजे केवळ शिक्षण नव्हे, तर संवाद कौशल्य, आत्मविश्वास, स्वावलंबन, निर्णयक्षमता, जबाबदारीची जाणीव व सामाजिक संवेदना विकसित करणे होय. समाजातील प्रश्न समजून घेणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे, दुर्बल घटकांबाबत सहानुभूती ठेवणे आणि सकारात्मक सामाजिक भूमिका घेणे ही जबाबदार युवकांची ओळख आहे. त्यामुळे युवकांनी स्वतःचा आत्मविकास साधत असतांना समाजसेवा आणि विकासात्मक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा. अशा समतोल दृष्टिकोनातूनच व्यक्ती, समाज आणि देशाचा शाश्वत विकास होतो, असे प्रतिपादन प्रा.डॉ. नरेंद्र माने यांनी केले. ते श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या दत्तकग्राम तोंगलाबाद येथे प्राचार्य डॉ अतुल बोडखे यांच्या मार्गदर्शनात आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिरात 'शाश्वत विकास आणि युवा' या विषयावर मार्गदर्शन करताना बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद अण्णासाहेब रेचे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ. मिलिंद भिलपवार, प्रा.डॉ. मंगलावती पांडेय, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. राहुल सावरकर व्यासपीठावर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय प्रा.डॉ. राहुल सावरकर यांनी करून दिला. संचालन कु.कोमल आगलावे हिने केले तर आभार कु. वैष्णवी कळमकर हिने मानले. या प्रसंगी रासेयो महिला कार्यक्रमाधिकारी डॉ.प्रीती दिवाण, सहा. कार्यक्रमाधिकारी डॉ.सुशील चरपे, डॉ.अपर्णा दिघडे, महाविद्यालयातील प्रा.डॉ.संतोष उके, प्रा.डॉ. हिमांशू जयस्वाल, प्रा.डॉ. वैशाली चोरपगार तथा स्वयंसेवक, स्वयंसेविका व गावातील नागरिक उपस्थित होते.

■ याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. मिलिंद भिलपवार यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जबाबदारीची जाणीव व सामाजिक भान ठेवून वाटचाल करण्याचे आवाहन आपल्या मनोगतातून केले.

■ आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये अण्णासाहेब रेचे यांनी विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनामध्ये शिस्त ठेवून, संवेदनशील नागरिक होण्यासाठी सतत प्रयत्न करत राहिलं पाहिजे असे मार्गदर्शन केले.

# उद्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया नेत्र, रक्त तपासणी

## निंबा येथे स्वर्गीय श्रीधररावजी देशमुख उपाख्य मालक जयंती उत्सवानिमित्त आरोग्य सेवेचा उपक्रम

**▸विदर्भ केसरी। निंबा:**




स्वर्गीय श्रीधररावजी देशमुख उपाख्य मालक यांच्या १०३ व्या जयंतीनिमित्त निंबा व परिसरातील नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया तसेच विविध रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर उपक्रम स्वर्गीय श्रीधररावजी देशमुख उपाख्य मालक प्रतिष्ठान, निंबा व जिल्हा रुग्णालय, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला असून जिल्हा रुग्णालयातील अनुभवी तज्ञ वैद्यकीय पथक नागरिकांची तपासणी करणार आहे.

हे शिबिर सोमवार, २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी २.०० वाजेपर्यंत श्री मारुती संस्थान, निंबा ता. बाळापूर जि. अकोला येथे संपन्न होणार आहे. या शिबिरात नेत्र तपासणीसोबतच मोतीबिंदू असलेल्या रुग्णांची तपासणी व मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

याशिवाय शिबिरात संपूर्ण रक्त तपासणी (CBC), मधुमेह नियंत्रण तपासणी (HbA1c), यकृत कार्य तपासणी (LFT), मूत्रपिंड कार्य तपासणी (KFT), थायरॉईड तपासणी (T3, T4, TSH), कॅल्शियम, व्हिटॅमिन डी, व्हिटॅमिन B12 तसेच हिपॅटायटिस बी (HBsAg) अशा महत्त्वाच्या तपासण्या पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहेत. जवळपास २००० रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या या रक्त तपासण्या नागरिकांना विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने एकाच ठिकाणी व्यापक आरोग्य तपासणीची मोठी संधी उपलब्ध होत आहे.

### गरजुंना लाभ घेण्याचे आवाहन

■ मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र रुग्णांना पुढील उपचारांबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक व गरजू रुग्णांनी या शिबिराचा विशेष लाभ घ्यावा असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

■ निंबा व पंचक्रोशीतील सर्व नागरिकांनी आपल्या कुटुंबीयांसह या मोफत आरोग्य सेवेचा लाभ घ्यावा, विशेषतः ज्येष्ठ नागरिकांनी अवश्य उपस्थित राहावे असे आवाहन स्वर्गीय श्रीधररावजी देशमुख उपाख्य मालक प्रतिष्ठान, निंबा चे सचिव प्रा. डॉ. मंदार कृष्णराव देशमुख यांनी केले आहे.

# शिवाजी महाराजांचे विचार समाजासाठी आजही प्रेरणादायी

## सौ प्राप्ती मारोटकर : शिवाई फाउंडेशन तर्फे शिवजयंती साजरी

**▸विदर्भ केसरी। अमोल धवसे**



नांदगाव छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आजही समाजासाठी प्रेरणादायी असून तरुणांनी शिवाजी महाराजांचे विचार आत्मसात करावे अशे प्रतिपादन नगराध्यक्ष सौ प्राप्ती मारोटकर यांनी केले

शिवजयंती निमित्ताने शिवाई चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे नांदगाव पो स्टे ठाणेदार श्रीराम लांबाडे नगराध्यक्ष सौ प्राप्ती मारोटकर यांच्या हस्ते पूजन करण्यात आले यावेळी शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य निर्माण सर्वांना समान न्याय दिला असल्याचे मत ठाणेदार लांबाडे यांनी व्यक्त केले जय भवानी जय शिवाजी अशा घोषणा देत शिवाजी महाराजांचा जय जयकार करण्यात आला यावेळी न प गटनेते प्रकाश मारोटकर यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते काँग्रेसचे अध्यक्ष अमोल धवसे नगरसेवक निलेश इखार राष्ट्रवादीचे अमोल शिरभाते श्रीकृष्ण सोळंके शुभम रावेकर भुमेश्वर गोरे अभय बनारसे सुरज लोमटे अनिकेत गटूले अक्षय हिवराळे अनिल मारोटकर सागर भामुद्रे जय मोकळेकर विक्की मारोटकर मोरेश्वर तानाकर आदित्य देशमुख हिमांशू तोटे समीर देशमुख राजेंद्र तानकर कांतेश्वरजी लोमटे प्रेम हिवराळे आदित्य गुलहाने पियुष रघुते आकाश लोमटे शुभम बीजवे ऋषी लोमटे ऋषी उगवेकर कृष्णा सपकाळ अतुल हळदे शरद घोडेस्वार कार्तिक सोनोने अमन मानकर हर्षल मारोटकर शरदाबाई सोनोने इत्यादी उपस्थित होते

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू TODAY

# चंद्रपूर

GOOD MORNING

## कात्रजमध्ये भरधाव डंपरच्या धडकेत महिलेचा मृत्यू

पुणे-सातारा रस्त्यावर कात्रज भागात भरधाव डंपरच्या धडकेत एका दुचाकीस्वार महिलेचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांनी डंपर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.परिमा हेमंत प्रधान (वय ३८, रा. श्री ज्वेलस सोसायटी, टिळेकरनगर, कात्रज-कोंढवा रस्ता) असे मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे नाव आहे. अभिषक निगडे (वय ३५, रा. कात्रज-कोंढवा रस्ता) यांनी याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. डंपर चालक संजय प्रभाकर जाधव (वय २८, रा. मानकर चौक, ऊरळी देवाची, हडपसर-सासवड रस्ता) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षक स्वप्नील पाटील या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निगडे यांच्या नातेवाईक परिमा प्रधान पुणे-सातारा रस्त्यावरून जात होत्या. कात्रज चौकातील राजीव गांधी प्राणी संग्रहालयासमोर भरधाव डंपरने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या अपघातानंतर डंपरचालक याने पळून जाण्याचा प्रयत्न केला मात्र पोलिसांनी त्याला पकडून त्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## संक्षिप्त



### श्री साई स्कूल ऑफ नर्सिंग, आरमोरी येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी..!

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

आरमोरी : स्थानिक श्री साई स्कूल ऑफ नर्सिंग, आरमोरी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांचे कर्तृत्व विद्यार्थ्यांसाठी सदैव प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन श्री साई इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग अँड मेडिकल सायन्स, वाकडीचे अध्यक्ष तसेच श्री साई स्कूल ऑफ नर्सिंग, आरमोरीचे संचालक सुधाकर साळवे यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज हे पराक्रमी, कर्तृत्ववान व दूरदृष्टी असलेले राजे होते. त्यांनी स्वराज्याची स्थापना आत्मविश्वास व ध्येयवादाच्या बळावर केली. विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनकार्याचा आदर्श अंगीकारून आपल्या ध्येयाकडे अथक प्रयत्नांनी वाटचाल करावी, असे आवाहन साळवे यांनी केले. शिवाजी महाराजांनी मिळवलेले स्वराज्य देशप्रेम आणि त्यागाचे प्रतीक असून विद्यार्थ्यांनीही हा माझा देश या भावनेतून कार्य करावे, असे त्यांनी नमूद केले. यावेळी कार्यक्रमाचे संचालन सुष्मिता सेलोटे व सानिया पेंदाम (जी.एन.एम. प्रथम वर्ष) या विद्यार्थिनींनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य मृणाल दर्वे, प्रतिक्षा क्षीरसागर, पौर्णिमा राऊत, प्राजक्ता गेडाम, समीर कांबळे, कॉलेजचे प्रशासकीय अधिकारी भूषण ठकार, चंदा गुरनूले, अल्का मारभते, वंदना मेश्राम, वासुदेव फुलबांधे आदींनी सहकार्य केले. या कार्यक्रमाला श्री साई नर्सिंग स्कूलमधील सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन जी.एन.एम. प्रथम वर्षातील विद्यार्थीनी श्रुती सूर्यवंशी हिने केले.



### वसंतपूर येथील नागरिकांचे माजी आमदार डॉ. देवराव होळी यांना निवेदन..!

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

चामोर्शी : तालुक्यातील मौजा वसंतपूर येथील नागरिकांनी सन 2024-25 मध्ये वादळी वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई अद्याप न मिळाल्या बद्दल माजी आमदार डॉ. देवराव होळी यांना निवेदन सादर केले. निवेदनात नमूद करण्यात आले की, सन 2024-25 दरम्यान झालेल्या वादळी वाऱ्यामुळे अनेक नागरिकांच्या घरांचे व शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. संबंधित पटवारीमार्फत पंचनामे करूनही काही नागरिकांना अद्याप नुकसान भरपाई मिळालेली नाही. त्यामुळे आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे नागरिकांनी सांगितले. तात्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी व प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करावा, अशी मागणी नागरिकांनी केली. यावेळी राम बिस्वास, हरेन बिस्वास, अनिमा रॉय, अनादी मंडल, तरणी बिस्वास, रमणी ढाली आणि सविता ढाली आदी उपस्थित होते. डॉ. होळी यांनी नागरिकांचे म्हणणे ऐकून घेत संबंधित विभागाशी संपर्क साधून लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.



### एटापल्ली तालुक्यातील ग्रामपंचात पुरसलगोंदी (नेंडेर)येथे वाचनालयाचे उद्घाटन

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

एटापल्ली : तालुक्यात आज दिनांक 21 फेब्रुवारी 2026 ग्रामपंचायत पुरसलगोंदी अंतर्गत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा नेंडेर या ठिकाणी वाचनालयाचे उद्घाटन करण्यात आले वाचनालयाच्या उद्घाटनप्रसंगी पंचायत समितीचे कृषी अधिकारी पवार सर, तसेच मनीष मेश्राम पेसा समन्वयक कपूर डेरिया मॅडम ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत पुरसलगोंदी तसेच ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, शिक्षक वृंद, व इतर गावकरी मान्यवर उपस्थित होते. सदर वाचनालयामध्ये विविध स्पर्धांसाठी पुस्तके ठेवण्यात आली तसेच शालेय मुलांसाठी सुद्धा विविध प्रकारचे पुस्तके आणि आजच्या या कार्यक्रमाचा अवचित्य साधून पेसा विषयक सुद्धा गावकरी मंडळींना पुस्तके पंचायत समिती कार्यालय मार्फत देण्यात आली. सदर कार्यक्रमाचे नियोजन हे ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत पुरसलगोंदी यांनी केले

### सहायक फौजदार लाच घेताना ताब्यात

तपासात मदत करणे, तसेच जप्त केलेली गाडी परत करण्यासाठी एक लाखांची लाच मागणाऱ्या मुळशीतील पौड पोलीस ठाण्यातील सहायक पोलीस फौजदाराला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अटक केली. तडजोडीत तक्रारदाराकडून ३५ हजारांची लाच घेताना सहायक फौजदाराविरुद्ध ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी पौड पोलीस ठाण्यातील सहायक पोलीस फौजदार सचिन बाळासाहेब शिंदे (वय ४६, रा. ग्रीन फ्लॉरेन्झा सोसायटी, सूस, ता. मुळशी) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एकाने पौड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदाराविरुद्ध पौड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यात जप्त केलेली गाडी परत करणे, तसेच तपासात मदत करण्यासाठी सहायक फौजदार शिंदे यांनी एक लाख रुपयांची लाच मागितली होती. याबाबत तक्रारदाराने एसीबीकडे तक्रार दिली होती. तक्रारीची पडताळणी करण्यात आली. तक्रारदाराने तडजोडीत ३५ हजार रुपयांची लाच देण्याचे मान्य केले. त्यानंतर पौड पोलीस ठाण्याच्या अंतर्गत असलेल्या मुळशी चौकीच्या परिसरात शुक्रवारी सायंकाळी सापळा लावण्यात आला.

# एकलव्य शाळेच्या इमारत बांधकामाचा मार्ग मोकळा

## करोडो रुपयांच्या प्रकल्पाला ग्रामसभेची हिरवी झेंडी

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**



कोरची : तालुक्यातील अतिदुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाच्या एकलव्य मॉडेल निवासी शाळा (EMRS) इमारत बांधकामाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. सातपुती ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या गुटेकसा येथे ११ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या विशेष ग्रामसभेत ग्रामस्थांनी ३.४४ हेक्टर वनजमीन शाळेसाठी देण्यास सर्वानुमते "ना हरकत" दिली. त्यामुळे गेल्या चार वर्षांपासून रखडलेला हा महत्वाकांक्षी प्रकल्प आता प्रत्यक्षात येण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे. सरपंच आनिता नुरूटी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या ग्रामसभेला आमदार रामदास मसराम, तहसीलदार प्रशांत गडम, गट विकास अधिकारी राजेश फाये, वनपरिक्षेत्र अधिकारी शेषराव नारनवरे, प्राचार्य धर्मेंद्र सिंग ठाकूर तसेच ग्रामविकास अधिकारी देवेंद्र काशीवार उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थांच्या शंका-आक्षेपांचे सविस्तर निरसन करण्यात आले. काही ग्रामस्थांनी जागेच्या सीमांकन व मोजणीबाबत मुद्दे उपस्थित केले होते. प्रशासनाने तांत्रिक बाबींवर तातडीने तोडगा काढण्याचे आश्वासन दिल्यानंतर ग्रामस्थांनी इमारत बांधकामासाठी सकारात्मक प्रतिसाद दिला. या निर्णयातून ग्रामस्थांमधील एकोप्याची भावना प्रकर्षाने दिसून आली. सदर जागेच्या वादाबाबत नोव्हेंबर महिन्यात विविध दैनिक वृत्तामधून बातम्या प्रसिद्ध झाली होत्या. तांत्रिक अडचणी न सुटल्यास वन विभागाकडे जमा केलेले सुमारे ७५ लाख रुपये परत जाण्याची व शाळा इतरत्र स्थलांतरित होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. या वृत्ताची जिल्हाधिकारी मा.फंडा यांनी दखल घेत तहसीलदारांना आवश्यक निर्देश दिले होते. दरम्यान, एकलव्य मॉडेल निवासी शाळा ही केंद्र सरकारची आदिवासी विद्यार्थ्यांसाठी महत्वाकांक्षी योजना असून सीबीएसई अभ्यासक्रमाच्या धर्तीवर गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा उद्देश आहे. अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावून त्यांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करण्यासाठी येथे भव्य व प्रशस्त इमारत उभारली जाणार आहे. सध्या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी शिक्षण व्यवस्था कोरची येथील शासकीय आश्रम शाळेत तात्पुरत्या स्वरूपात सुरू आहे. आता जमीन प्रश्न मार्गी लागल्याने लवकरच करोडो रुपयांच्या या इमारत बांधकामाला गती मिळणार असून आदिवासी विद्यार्थ्यांसाठी हा निर्णय मैलाचा दगड ठरणार आहे. त्यामुळे स्थानिक गुटेकसा येथील लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.



### पोट भरण्यासाठी जीवाशी खेळण्याचा प्रयत्न? पैनगगा नदी माहूर गड

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : अरविंद चौधरी**

घाटंजी आज दी 21शनिवार ला माहूर ला लागूनच असणारी पैनगगा नदी यवतमाळ जिल्याची बार्डर वर आहे दोन जिल्याला जोडणार माहूर पूल उत्तर वाहिनी नदीचे पात्र आहे ईथे एक पूजा विधी ला गेलो असता त्या नदीवर हा प्रकार दिसला मच्छिमार करणारे पुलावरून जात असलेल्या जिवंत लाईन चा करंट वायर बांबू ला बांधून नदी पात्रता टाकून करंट नी त्या नदीत उतरून मासोळी ला डायरेक्ट करंट देऊन मासोळी पकडत होते त्यांना वीचारले असता तुम्ही पाण्यात उतरून हा प्रयोग करता हे जीवाशी खेळणे नाही का हे विचारले तर पोटासाठी करते नतंर ते निगुन गेले प्रशासन लक्ष देईल का कारण या नदीवर अनेक लोक येत असतात ही नदी उत्तर वाहिनी असल्यामुळे ईथे गर्दी असतात याकडे प्रशासन लक्ष देईल का असा अनेक यात्रे करू चर्चा आपसात करीत होते



## भरधाव ट्रकची ट्रॅक्टरला जबर धडक, दोन ठार तर तिघे गंभीर


**विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

कोरची ( दि. 21) :- तालुका मुख्यालयापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावर कोरची-मोहगाव मार्गावर भरधाव ट्रकने ट्रॅक्टरला मागून दिलेल्या जबर धडकेत दोन कामगारांचा मृत्यू झाला असून तिघे गंभीर जखमी झाले आहेत. प्राप्त माहितीनुसार, झेंडेपार येथील बंधाऱ्याच्या कामासाठी लोखंडी साहित्य घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टरला हैदराबादहून रायपूरकडे दगडांची चुरी घेऊन जाणाऱ्या CG07BA9284 क्रमांकाच्या ट्रकने जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की सागर कल्लो (वय 20, रा. चांदागड) यांचा जागीच मृत्यू झाला, तर कैलास कोवे (वय 35, रा. वाकडी) यांचा रुग्णालयात नेत असताना वाटेत मृत्यू झाला. तर प्रदीप नैताम (वय 24, रा. चीचटोला) व राजेश गंगाभोईर (वय 28, रा. चिंचगाव) यांचे हात फॅक्चर झाले असून ट्रॅक्टर चालक पुरुषोत्तम मडकाम (वय 51) हे गंभीर जखमी झाले आहेत.

अपघातानंतर 108 रुग्णवाहिकेशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला मात्र संपर्क होऊ न शकल्याने जखमींना पोलिसांच्या मदतीने खाजगी वाहनातून ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालय, गडचिरोली येथे हलविण्यात आले आहे. दरम्यान, अपघातानंतर ट्रक चालक अभिषेक शर्मा (वय 30, रा. चितवाडा, जि. बालिया, उत्तरप्रदेश) हा घटनास्थळावरून पसार होण्याच्या प्रयत्नात होता. पोलिसांनी तात्काळ नाकाबंदी करून तपासणी नाक्यावर संशयित ट्रक अडवला आणि चालकाला ताब्यात घेण्यात यश मिळवले. या प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.

## नवीन पदभरतीत 'ट्रायबल फर्स्ट' धोरण लागू

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**



मुंबई / गडचिरोली : राज्यातील दुर्गम आणि आदिवासी भागातील आरोग्य सेवा सक्षमीकरणासाठी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी एक क्रांतिकारी निर्णय घेतला आहे. यापुढे आरोग्य विभागातील नवीन पदभरती करताना , व सेवांतर्गत पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण झालेल्या (PG) उमेदवाराना प्रथम आदिवासी भागात नियुक्ती देण्यात येवून रिक्त पदे भरण्यात येतील. त्यानंतरच बिगर आदिवासी भागातील पदे भरण्यात येतील. गेल्या वर्षभरात आरोग्यमंत्र्यांनी राज्यातील सर्व आदिवासी व दुर्गम जिल्ह्यातील आरोग्यसंस्थांना भेटी देऊन प्रत्यक्ष कामकाजाचा आढावा घेतल्यानंतर हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या संदर्भातील अधिकृत शासन निर्णय आरोग्य विभागाकडून जारी करण्यात आला असुन या निर्णयामुळे आदिवासी दुर्गम भागातील विशेषतज्ञासह सर्व संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे प्राधान्याने भरली जातील. त्यामुळे आदिवासी भागातील वैद्यकीय सुविधांचा दर्जा सुधारण्यास मदत होणार आहे. आदिवासी भागामध्ये सोयी-सुविधांच्या अभावामुळे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे अनेक पदे रिक्त राहत असत. बिगर आदिवासी भागात सेवा दिलेल्या आरोग्य अधिकाऱ्यांनाही यापुढे आदिवासी दुर्गम भागात सेवा द्यावी लागणार आहे. आदिवासी भागात नियुक्त वैद्यकीय अधिकाऱ्यांना तीन वर्षानंतर बदलीसाठी विनंती करता येईल मात्र त्यांचे जागी दुसरे वैद्यकीय अधिकारी हजर झाल्यानंतरच त्यांना कार्यमुक्त करण्याचे धोरण आहे. या शासन निर्णयामुळे आदिवासी, दुर्गम भागात तज्ञ डॉक्टरांची कमतरता भासणार नाही. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाचा मान राखून आदिवासी भागातील रुग्ण सेवा अधिक बळकट करण्यासाठी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी प्रशासनाला हे धोरण तात्काळ लागू करण्याचे निर्देश दिले आहेत. महायुतीचे सरकार मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी दुर्गम भागातील जनतेच्या आरोग्याच्या संदर्भात गांभीर्याने पावले उचलत असून, माता मृत्यू, बालमृत्यू, सिकलसेल, ॲनिमिया, इत्यादी समस्येवर मात करून आदिवासी बांधवांना वेळेवर व चांगली रुग्णसेवा मिळेल" असा विश्वास आरोग्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

## आरमोरी तालुक्यात बस्तान मांडलेल्या जंगली हत्तींचा शिरकाव कुरखेडा तालुक्यात..!

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

गडचिरोली : जिल्ह्याच्या आरमोरी तालुक्यात मागील काही दिवसांपासून बस्तान मांडलेल्या जंगली हत्तींनी कुरखेडा तालुक्यात शिरकाव केला आहे. काल शुक्रवारी पहाटेच्या सुमारास हत्तींनी कुरखेडा तालुक्याच्या भगवानपूर शेतशिवारात हैदोस घालत शेतकऱ्यांच्या ऊन्हाळी धान पिकांची पहे पायाखाली तुडवल्याने ऊन्हाळी धान उत्पादक शेतकरी संकटात सापडले आहेत. विशेष म्हणजे, आरमोरी तालुक्यात बस्तान मांडलेल्या जंगली हत्तींनी चार दिवसांपूर्वी चामोर्शी चक शेतशिवारात प्रचंड हैदोस घातला होता. परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतपिकाची तसेच शेतीपयोगी साहित्यांसह शेतमालाचे प्रचंड नुकसान केले होते. घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या पथकाने तात्काळ घटनास्थळ गाठत पंचनामा केला होता. प्रकरणी वनविभागाने परिसरातील नागरिक तसेच शेतकऱ्यांना सतर्कता बाळगण्याचे आवाहन केले आहे. बलाढ्य असलेले जंगली हत्ती बऱ्याच कालावधीपासून गडचिरोली जिल्ह्याच्या वेगवेगळ्या ठिकाणी बस्तान मांडून धुमाकूळ घालत असल्याने नागरिक तसेच शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.



## समस्त क्षेत्रात महारथ प्राप्त केलेले पृथ्वीवरील एकमेव शिवाजी महाराज : दुधबावरे

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

आरमोरी / बोरी : मध्ययुगीन काळच नव्हे तर एकंदरीत आजपर्यंतचा सर्व ज्ञात इतिहासाचा अवलोकन केल्यास अस आढळून येते की व्यवस्थापन संघटन कौशल्य, आरमार, वैज्ञानिक, स्थापत्यशास्त्र, युद्धनीती, दूरदृष्टी विचार अशा विविध क्षेत्रात महारथ प्राप्त केलेले केवळ भारत भूमीवरीलच नव्हे तर जगाच्या पटलावरील एकमवे राजे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय असे उद्बोधन प्रमुख वक्ते म्हणून मंचावर उपस्थित युवा व्याख्याते तुषार दुधबावरे यांनी केले. शिवकाळात छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या सैन्यांनी स्वारीमध्ये जिंकून आणलेल्या कल्याणच्या मुस्लिम सुभेदाराच्या सुनेला स्वतःच्या आई प्रणाने मान सन्मानाची वागणूक देऊन, साडी चोळी देऊन त्या सुनेला सुखरूप परत पाठवून जगाच्या इतिहासात उत्तम चारित्र्याचा नवा अध्याय लिहिला होता असे बोरी येथील शिवजन्मोत्सव कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळेस प्रकाश सावकार पोरेड्डीवार यांनी देखील छ. शिवाजी महाराजांच्या जीवनावर प्रकाश टाकला. महेंद्र ब्राह्मणवाडे जिल्हाध्यक्ष काँग्रेस यांनी शेतकरी आणि छ. शिवाजी महाराजांचा कल्याणकारी राज्य यावर आपले विचार व्यक्त केले. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थिनींच्या चमूने शिवबांच्या जन्मावर आकर्षनीय नृत्य सादर केला. "बोरीचक येथे छ. शिवाजी महाराज संस्थानच्या वतीने स्वराज्याचे संस्थापक छ. शिवाजी महाराजांच्या भव्य अश्वारूढ स्मारकाचे लोकार्पण सहकारमहर्षी प्रकाश सावकार पोरेड्डीवार यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आरमोरीचे मा.आमदार गजबे तसेच विषेश अतिथी म्हणून भारतीय काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे, डॉ. दुर्वेश भोयर, प्रा. दौलतराव धुर्वे, लंकेश भोयर मा. प्राचार्य, विश्वेश्वर दर्रो हे मंचावर उपस्थित होते. सूत्रसंचालन देवानंद उरकुडे यांनी तर आभार निनाद भोयर स्मारक समिती अध्यक्ष यांनी व्यक्त केले. यावेळी शेकडो शिवभक्त व गावकरी शिवजन्मोत्सव सोहळ्याला उपस्थित होते.



## पुण्यातील गुलटेकडीत अल्पवयीन आरोपींकडून दहशत



पुण्यातील गुलटेकडी परिसरात अल्पवयीन मुलांनी देशी बनावटीच्या पिस्तुलातून गोळीबार करत दहशत माजवल्याची घटना शुक्रवारी रात्री घडली. या प्रकरणी स्वारगेट पोलिसांनी चार अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे. मीनाताई ठाकरे वसाहत परिसरात २० फेब्रुवारी रोजी रात्री पावणेअकराच्या सुमारास चार अल्पवयीन दुचाकीवरून आले. त्यांनी नागरिकांना 'आम्ही या भागातील भाई आहोत, येथे आमचीच चालणार. या भागात राहायचे असेल तर हप्ता द्यावा लागेल,' असे धमकावले. यावेळी त्यांनी त्यांच्याकडील पिस्तूल उगारून दहशत निर्माण केली. नागरिकांना शिवीगाळ करत त्यांनी पिस्तुलातून हवेत गोळीबार केला आणि शस्त्राचा धाक दाखवला. या घटनेनंतर अल्पवयीन मुले दुचाकीवरून पसार झाली. गोळीबाराच्या घटनेमुळे परिसरातील नागरिक भयभीत झाले. त्यांनी तात्काळ पोलिसांना या घटनेची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तपास सुरू केला आणि पसार झालेल्या चारही अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले. सहायक पोलिस निरीक्षक अभिजित पाटील या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## संक्षिप्त



### गडचिरोलीत ऑइल सांडल्याने दुचाकींची घसरगुंडी ; एकाचा गुडघा फॅक्चर..!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

गडचिरोली : गडचिरोली शहरातील चंद्रपूर मार्गावर कारगिल चौक परिसरात शनिवारी 21 फेब्रुवारी 2026 दुपारी सुमारे 2.30 वाजताच्या सुमारास दुचाकी वाहनाच्या इंजिनमधील ऑइलचा नट निघाल्याने सुमारे 100 मीटरपर्यंत रस्त्यावर ऑइल सांडल्याची घटना घडली. या अचानक निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे मागून येणारी वाहने घसरु लागली आणि दोन दुचाकी वाहनचालकांचा अपघात झाला. प्रत्यक्षदर्शीच्या माहितीनुसार, रस्त्यावर मोठ्या प्रमाणात ऑइल पसरल्याने वाहनचालकांना धोका निर्माण झाला होता. त्यात दोन दुचाकीस्वार घसरून पडले. यामध्ये एका व्यक्तीच्या गुडघ्याला गंभीर दुखापत होऊन फॅक्चर झाले. जखमीस तातडीने उपचारासाठी शहरातील डॉ. बिडकर दवाखाना येथे दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तपासणीनंतर शस्त्रक्रियेचा सल्ला दिला असल्याची माहिती मिळाली आहे. जखमी व्यक्ती हे गडचिरोली पोलीस स्टेशन येथील पीएसआय तरारे यांचे नातेवाईक असल्याचे समजते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान, पुढील अपघात टाळण्यासाठी रस्त्यावर सांडलेल्या ऑइलवर पोलिस दलाच्या तत्परतेने तातडीने माती टाकून मार्ग वाहतुकीसाठी सुरक्षित करण्यात आला व मोठा अपघात टळला. ही कार्यवाही एपीआय शरद मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार विजय वेलादी यांच्या वतीने करण्यात आली. या घटनेमुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. वाहनचालकांनी अशा प्रकारच्या यांत्रिक बिघाडांबाबत दक्षता घेण्याची गरज व्यक्त होत आहे.

### मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीच्या सरपंच आणि पदाधिकाऱ्यांना प्रशासक म्हणून नेमणुकीच्या सूचना

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली :- राज्यभरातील ज्या ज्या ग्रामपंचायतीची मुदत संपली त्या सर्व ग्रामपंचायतींना पुन्हा एकदा सहा महिने पदभार स्वीकारण्याचे राज्य शासनाचे आदेश निघाले असून सदर सरपंच व पदाधिकाऱ्यांना सहा महिने ग्रामपंचायतीवर प्रशासक म्हणून काम सांभाळण्याच्या सूचना महाराष्ट्र राज्य सरकारने आदेश दिले आहेत. याचाच अर्थ असा की, राज्यात परत सहा - सात महिने कुठल्याही निवडणुका होण्याची चिन्ह दिसत नसून आज पर्यंत पाच वर्ष ज्या ग्रामपंचायत मध्ये विविध व्यवहार झाले, विविध कामे झाली त्याचा आणि गावकऱ्यांच्या कामात कोणताही अडथळा येऊ नये म्हणून सदर आदेश जाहीर करण्यात आले असून, राज्यातील मुदत संपलेल्या सर्व ग्रामपंचायत मधील सरपंच पदाधिकारी यांना मोठा दिलासा मिळाला असून ग्रामपंचायतीचे पदाधिकारी मोठ्या उत्साहात दिसत आहेत.



### कुरखेडा येथे शिवजयंती निमित्त शरबत वाटप; युवा नेते स्वप्रिल खोब्रागडे यांचा उपक्रम

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

कुरखेडा : रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त कुरखेडा येथे स्वप्रिल खोब्रागडे यांच्या तर्फे शरबत वाटपाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या सामाजिक उपक्रमाला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिवजयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात उपस्थितांना शरबत वितरित करण्यात आले. वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर आयोजित केलेल्या या उपक्रमामुळे नागरिकांना दिलासा मिळाला. कार्यक्रमासाठी युवांगण मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. युवकांनी शिस्तबद्ध नियोजन करून कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.
यावेळी शिवाजी महाराजांच्या कार्याची आठवण करून देत समाजहितासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. स्वप्रलील खोब्रागडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून भविष्यातही सामाजिक उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमामुळे परिसरात उत्साहाचे आणि सामाजिक ऐक्याचे वातावरण निर्माण झाले. यावेळी हरीश टेलका, प्रशांत हटवार, हर्षल धाबेकर, अमित उईके, शोएब पठाण, लक्ष्मण धुळसे, रितेश मनुजा, हिरा चौधरी, गणेश चौधरी, सम्यक राऊत, शुभम बुल्ले, तुषार गावडे, सुरज बुल्ले, संदेश राऊत, गौतम बोदेले, मोहित मांडवे, रोहन कराडे, शंकर मिसार, चेतन कराडे, श्रेयस फाये, विशांत खोब्रागडे, शंतनु खोब्रागडे, सोनु गोटेफोडे, कृपा बावणकर, मंदार फुलबांधे,हिमांशु कन्नाके, सोहम पाटील, गोलू बनसोड, विक्की चौधरी, संस्कार फाये, नुकेश सहारे, देव केशवानी यांनी सहकार्य केले.

### एपीके फाईल' पाठवून साडेसहा लाखांची फसवणूक

वाहतूक नियमभंगाचे चलन, तसेच बँकेच्या नावे बनावट कागदपत्रे एपीके फाईल पाठवून सायबर चोरट्यांनी दोघांची साडेसहा लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध विश्रांतवाडी आणि मुंढवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विश्रांतवाडी भागातील एका तक्रारदाराची सायबर चोरट्यांनी प्रादेशिक परिवहन विभागाकडून (आरटीओ) करण्यात आलेल्या कारवाईचे बनावट दंडात्मक चलन पाठवून तीन लाख ६४ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एकाने विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सायबर चोरट्यांनी गेल्या महिन्यात तीन जानेवारी रोजी दंडात्मक कारवाईचे बनावट चलन तक्रारदाराला पाठविले होते. हे चलन एपीके फाईलच्या माध्यमातून पाठविण्यात आले होते. ही फाईल उघडताच चोरट्यांनी त्यांच्या बँक खात्यातून तीन लाख ६४ हजार रुपयांची रोकड स्वत:च्या खात्यात वळविली. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर त्यांनी नुकतीच पोलिसांकडे तक्रा दिली.

# गोंडपिंपरी पोलिसांची धडक कारवाई ; ५ पिक-अपसह ४६ गोवंशीय जनावरांची सुटका..!

## ५० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त; दोन आरोपी ताब्यात..!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

■ सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी सत्यजित आमले यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार रमेश हत्तीगोटे, पो हवा विलास कोवे, वंदीराम पाल, अनुप कवठेकर, पोअं अतुल तोडासे, तिरुपती गोडसेलवार, प्रवीण कडुकर, प्रशांत नैताम, सुनील गव्हारे, चालक पूनेश्वर कुळमेथे, मनीषा ठाकरे, सैनिक रियाज शेख, प्रशांत गुडपल्ले यांनी केले.



चंद्रपूर : अवैधरित्या गोवंशीय जनावरांची कत्तलीसाठी वाहतूक करणाऱ्या तस्करांविरुद्ध गोंडपिंपरी पोलीसांनी यांनी आज २१ फेब्रुवारी रोजी मोठी कारवाई करत ५ पिक-अप वाहने जप्त केली असून ४६ गोवंशीय गाय व बैलांची सुटका केली आहे. या कारवाईत एकूण ५० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. गोंडपिपरी पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, गडचिरोली येथून तेलंगणा राज्यात ५ पिक-अप वाहनांद्वारे गोवंशीय जनावरांची अवैधरित्या कत्तलीसाठी वाहतूक होणार आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे मौजा वढोली येथे पहाटे नाकाबंदी करण्यात आली. सकाळी सुमारे ६.३० वाजताच्या सुमारास संशयित पिक-अप वाहने येताना दिसताच पोलिसांनी थांबवण्याचा इशारा दिला. समोरील वाहन थांबवून आरोपी मोहसीन आयुब खान (४०), रा. वाकडी, जि. आसिफाबाद व मोहम्मद मंजूर अली (४२), रा. माजीदवाडा, ता. वाकडी, जि. आसिफाबाद, तेलंगणा यांना ताब्यात घेतले. दरम्यान, मागील चार वाहनचालकांनी पोलिसांची उपस्थिती पाहून वाहने वळवून पळण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी तत्काळ पाठलाग केला असता वढोली नदी पुलाजवळ त्यांनी वाहने सोडून शेतशिवारात पळ काढला. पोलिसांनी परिसरात शोधमोहीम राबविली; मात्र ते मिळून आले नाहीत.

जप्त करण्यात आलेल्या ५ पिक-अप वाहनांमधून एकूण ४६ गोवंशीय गाय व बैल किंमत ९ लाख २० हजार रुपयेतसेच ५ पिक-अप वाहने किंमत ४१ लाख रुपये असा एकूण ५० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपींविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला असून फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

## खोट्या विकासाच्या दाव्यांमागे लपलेला पूनागुडा– पंदेवाही रस्त्याचा प्रश्न ; तात्काळ डांबरी रस्त्याची मागणी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

एटापल्ली : एटापल्ली तालुक्यातील पूनागुडा ते पंदेवाही या मार्गाची बिकट अवस्था सरकारच्या खोट्या विकासाच्या दाव्यांना उघडे पाडणारी असल्याची टीका भारतीय कम्युनिस्ट पार्टी, गडचिरोली जिल्हा यांच्या वतीने करण्यात आली आहे. मोठमोठ्या घोषणा आणि जाहिरातींमध्ये विकासाचे चित्र रंगविले जात असताना प्रत्यक्षात ग्रामीण भागातील रस्ते मात्र कच्चे, अर्ध कच्चे व उकडलेल्या डांबराच्या अवस्थेत असल्याचे वास्तव समोर आले आहे. सदर मार्गाच्या काही भागात पूर्णपणे कच्चा रस्ता आहे, तर काही ठिकाणी अर्ध कच्चा व डांबर उकडलेले आहे. अनेक ठिकाणी डांबर निघून जाऊन मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. रस्त्यावर खडी वर आली आहे, माती बाहेर पडलेली आहे. पावसाळ्यात चिखल व पाण्याचे डबके तयार होतात, तर उन्हाळ्यात धुळीमुळे प्रवास अत्यंत त्रासदायक ठरतो. हा रस्ता म्हणजे तथाकथित विकासाच्या दाव्यांवर थेट प्रश्नचिन्ह असल्याचे पक्षाने म्हटले आहे. या रस्त्याच्या बिकट अवस्थेमुळे महिला, शालेय विद्यार्थी, रुग्ण, वृद्ध नागरिक, प्रवासी व इतर नागरिकांना दररोज हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. गर्भवती महिलांना आरोग्य केंद्रात पोहोचविताना जीव धोक्यात घालावा लागतो, रुग्णवाहिका वेळेत पोहोचत नाही, विद्यार्थ्यांचे शिक्षण बाधित होते, तर वृद्धांसाठी प्रवास हा संकटमय बनला आहे. तरीदेखील या मार्गावर कायमस्वरूपी डांबरी रस्ता उभारण्याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. दरम्यान, पूनागुडा आणि पंदेवाही गावच्या नागरिकांनी कॉ. सचिन मोतकुरवार यांच्याकडे या प्रश्नावर लक्ष देण्याची विनंती केली होती. त्यानुसार त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून शासन-प्रशासनाकडे निवेदन सादर केले. निवेदन देताना त्या भागातील अनेक नागरिक उपस्थित होते. जिल्हा सहसचिव कॉ. सचिन मोतकुरवार यांनी स्पष्ट शब्दांत म्हटले की, "विकासाच्या केवळ घोषणा करून ग्रामीण जनतेची फसवणूक चालणार नाही. पूनागुडा–पंदेवाही मार्गावर तात्काळ दर्जेदार नवीन डांबरी रस्ता मंजूर करून काम सुरू करावे. खड्डे बुजविण्याच्या तात्पुरत्या उपायांनी प्रश्न सुटणार नाही.



कायमस्वरूपी रस्ता हा आमचा ठाम मुद्दा आहे. अन्यथा पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन उभारले जाईल." ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांसाठी ठोस कृती करावी आणि पूनागुडा–पंदेवाही मार्गाचा नवीन डांबरी रस्ता तातडीने मंजूर करावा, अशी ठाम मागणी भारतीय कम्युनिस्ट पार्टीच्या वतीने शासन-प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

## चेतन ग्राफिक्स आणि साथ फाउंडेशनतर्फे शिवजयंती

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : गडचिरोली तालुक्यातील कोटगल येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती अतिशय उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन स्थानिक 'चेतन ग्राफिक्स' आणि साथ फाउंडेशन ता. जि. गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलन करून महाराजांची महाआरती करण्यात आली. यावेळी संपूर्ण परिसर "जय भवानी, जय शिवाजी" च्या जयघोषाने निनादला होता. महाआरती झाल्यानंतर लगेज महाप्रसाद वितरण करण्यात आहे. या सोहळ्याचे आयोजन चेतन ग्राफिक्स आणि साथ फाउंडेशन ता. जि. गडचिरोली, यांनी केले असून, युवकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार रुजवणे आणि सामाजिक एकोपा जोपासणे हा यामागचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमात मोहन ठाकरे सामाजिक कार्यकर्ता, मनोहर दुधाबावरे, रामदास ठाकरे, शिवाजी भोयर,बालाजी कोलते. निधी अमोल गद्देवार, आकाश भोयर , हरिष कोलते, गावातील नागरिक, युवक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. व चेतन ग्राफिक्सचे मालक व साथ फाऊंडेशनचे सचिव चेतन कोलते यांनी आयोजन केले. साथ फाउंडेशनच्या सदस्यांनी यावेळी बोलताना सांगितले की, महाराजांचे स्वराज्य स्थापनेचे कार्य आणि त्यांचे शौर्य आजही आपल्याला प्रेरणा देते. चेतन ग्राफिक्सच्या वतीने गावातील या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजक संस्थांच्या कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.




## क्रीडा महोत्सवात महसूल अधिकारी कर्मचारी व्यस्त, घाटावर रेती माफियांची मोहीम मस्त

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : जिल्हास्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी जिल्हा मुख्यालयात व्यस्त असताना, जिल्हाभरात रेती माफियांची मोहीम मात्र सुरु झाली होती. कुरखेडा तालुक्यातील वाकडी- मोहोगाव येथील शासकीय रेती घाटावर नियमबाह्य उपसा सुरु असल्याची गंभीर चर्चा तालुक्यात रंगू लागली आहे. घाटावर प्रत्यक्ष देखरेखीचा अभाव निर्माण झाल्याने काही ठिकाणी जीपीएस प्रणाली व ई-टीपी तपासणी शिवायच रेती वाहतूक सुरु असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. जिल्हास्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा 2026 चे उद्घाटन जिल्हाधिकारी अविश्यांत पांडा यांच्या हस्ते पार पडले. या स्पर्धेमुळे महसूल विभागातील मोठा कर्मचारी वर्ग जिल्हा मुख्यालयात सहभागी झाला असल्याचे सांगितले जाते. परिणामी, घाटावरील नियंत्रण सैल झाल्याचे चित्र दिसत आहे. नायब तहसीलदार राजकुमार धनबाते यांनी दूरध्वनीवर प्रतिक्रिया देताना सांगितले की, 'क्रीडा महोत्सवामुळे कर्मचारी मुख्यालयात आहेत. घाट बंद ठेवण्याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली होती.' तथापि, प्रत्यक्षात घाटावर उपसा सुरु असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. शासनाने वाकडी घाट गरजू लाभार्थ्यांसाठी 600 ते 650 रुपये प्रति ब्रास रॉयल्टीवर निर्गमित केला आहे. मात्र, ई-टीपी पडताळणी व जीपीएस प्रणालीची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने काही ट्रॅक्टर - ट्रॉलींवर जीपीएस प्रणाली नसतानाही रेती वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे 'जीपीएस नसेल तर ई-टीपी कशी?' आणि 'ई-टीपीशिवाय वाहतूक कशाच्या आधारे?' असे सवाल उपस्थित होत आहेत. अनियंत्रित उपशामुळे शासकीय महसूल बुडीत जाण्याची तसेच पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# चामोर्शीत बारावी परीक्षा केंद्रावरील गैरप्रकार उघडकीस

## सीईओंच्या झडतीत उत्तरांच्या कॉप्या जप्त...!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

चामोर्शी : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ यांच्या वतीने सुरू असलेल्या बारावीच्या परीक्षेदरम्यान चामोर्शी येथील जा. कृ. बोमनवार हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर गैरप्रकार होत असल्याचे उघडकीस आल्याने शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे यांनी केलेल्या प्रत्यक्ष भेटीत हा प्रकार समोर आला. राज्यात १० फेब्रुवारीपासून बारावीची परीक्षा सुरू झाली असून परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता व कॉपीमुक्त वातावरण राखण्यासाठी शिक्षण विभागाकडून भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली होती. त्याच अनुषंगाने १८ फेब्रुवारी रोजी सुहास गाडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने संबंधित परीक्षा केंद्राला अचानक भेट दिली.

त्यावेळी भेटीदरम्यान शाळेतील एका परिचराची झडती घेण्यात आली असता, त्याच्या खिशात उत्तरांच्या कॉप्या आढळून आल्या. हा प्रकार उघड होताच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी संबंधित कॉप्या तात्काळ जप्त केल्या. प्राथमिक चौकशीत संबंधित परिचराने काही जणांची नावे सांगितल्याची चर्चा असून, या प्रकरणात आणखी काही व्यक्तींचा सहभाग असण्याची शक्यता वर्तविली जात आहे. या घटनेमुळे परीक्षा केंद्रातील देखरेख आणि प्रशासनाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

बारावीची परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्याच्या शासनाच्या निर्णयाला या प्रकारामुळे तडा गेल्याची चर्चा शैक्षणिक वर्तुळात सुरू आहे. दरम्यान, जिल्हा परिषदेचे माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी वासुदेव भुसे यांनी सांगितले की, या गैरप्रकाराचा सविस्तर अहवाल मंडळाच्या नागपूर येथील विभागीय कार्यालयास पाठविण्यात आला आहे.



वरिष्ठांकडून आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधितांवर पुढील योग्य ती कारवाई करण्यात येईल. सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत असून, परीक्षा प्रक्रियेतील शिस्त व पारदर्शकता राखण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर उभे ठाकले आहे.




# पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.




## खा... आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक ता... १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

### न...
- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.


### अमरावती
जिल्हा प्रतिनिधी
- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरूड, इतर

### अकोला
जिल्हा प्रतिनिधी
- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

### यवतमाळ
जिल्हा प्रतिनिधी
- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.

### बुलढाणा
जिल्हा प्रतिनिधी
- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

### चंद्रपूर
- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



### आकर्षक वेतन
संगणक चालक पेज डिझायनर.
- कोरल
- फोटोशॉप
- इनडिझाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा.

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यानी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअॅप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**